# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ५ ऑगस्ट २००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

गुरूवार दिनांक ०५.०८.२००४ रोजी मा.महापौर सौ.रूख्मीणी राधाकिशन शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह '' येथे दुपारी १२.५० वाजता ''वंदेमातरम '' या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
०२. स.स.श्री .घोडेले नंदकुमार राधाकिसन
०३. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
०४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
०५. स.स.श्री.वाणी ठकूजी रामसिंग
०६. स.स.श्री.तांबे गणेश रामचंद्र
०७. स.स.सौ.साजेदा बेगम निखार अहेमद
०८. स.स.श्री.शेख ईलियास किरमाणी शेख उमर
०९. स.स.श्री.औताडे रावसाहेब ममतू
१०. स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी
११. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
१२. स.स.श्री.कावडे साहेबराव राणूबा
१३. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४. स.स.सौ.पवार मंदाबाई प्रभाकर
१५. स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
१६. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोंखडे
१७. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१८. स.स.श्रीमती डॉ.आशा बिनवडे
१९. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२०. स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मण
२१. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
२२. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२३. स.स.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२४. स.स.श्री.राजेंद्रसिंग जबिंदा
२५. स.स.श्री.साळवे माणिक लक्ष्मण
२६. स.स.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे
२७. स.स.श्री.नजर हमीद अ.गफ़ुर
२८. स.स.श्री.शे.खाजा शे.शरफ़ोद्दीन
२९. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
३०. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडूरंग
३१. स.स.श्री.डॉ.भागवत किसनराव कराड
३२. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर

३३. स.स.सौ.रशिदा बेगम गफ़्फ़ार यार खॉन
३४. स.स.शिंदे किशोर रावसाहेब
३५. स.स.श्री.अ.कादर अ.हफ़ीज
३६. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
३७. स.स.श्री.नासेरखॉन सरदारखॉन
३८. स.स.श्री.मोहम्मद जावेद मोहम्मद इसहाक
३९. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
४०. स.स.सौ.खरात कुसूमबाई दौलत
४१. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब
४२. स.स.सौ.नुसरत बानो फ़िरोजखान
४३. स.स.सौ.मोरे जयश्री कुमारराव
४४. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४५. स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
४६. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
४७. स.स.श्री.पारे सोपान भाऊराव
४८. स.स.सौ.विमलताई भिकनसिंग राजपूत
४९. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
५०. स.स.श्री.अ.कदिर मौलाना सय्यद
५१. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजूरकर
५२. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
५३. स.स.श्री.राधाकृष्ण गायकवाड
५४. स.स.सौ.संगिता बाळू मैंद
५५. स.स.श्री.रणधीरसिंग होलिये
५६. स.स.श्री.नासीरखान अ.रहेमान खान कुरैशी
५७. स.स.श्रीमती शाहीन जफ़र महेमुद ज़फर
५८. स.स.श्री.जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५९. स.स.सौ.चंद्रभागाबाई दाणे
६०. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
६१. स.स.श्री.सय्यद सलीम सय्यद युसुफ़
६२. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
६३. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
६४. स.स.सौ.सिद्दीकी नईम सुलताना म.फ़सियोद्दीन
६५. स.स.श्री.अजीज खॉन गणी खॉन
६६. स.स.सौ.सुलताना बेगम चॉंद खॉ
६७. स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
६८. स.स.श्री.शेख मुनाफ़ शेख यासीन
६९. स.स.श्री.सलीम पटेल समशेर पटेल
७०. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
७१. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
७२. स.स.सौ.बबिता सुभाष कागडा
७३. स.स.सौ.निखत परविन एजाज अली

**(नामनिर्देशित पालिका सदस्य )**

०१. स.स.श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
०२. स.स.श्री.भगवान देविदास घडमोडे
०३. स.स.श्री.सुरजितसिंग खुंगर
०४. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग

**संवाद :**

श्री.प्रशांत देसरडा : माजी उपनगराध्यक्ष स्व.मोहनलालजी वर्मा यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे. श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.नंदकुमार घोडेले : महानगरपालिकेचे सुरक्षा रक्षक पै.मो.मोहसीन महेबूब यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांनाही या सभागृहा तर्फे ३ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.किशनचंद तनवाणी : यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : सर्वांनी श्रध्दाजंली साठी ०२ मिनिटे उभे राहावे.

(याचवेळी सभागृहातर्फे स्व.मोहनलालजी वर्मा तसेच महापालिकेचे सुरक्षा रक्षक पै.मो.मोहसीन मेहबुब यांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यांत आली.)

मा.महापौर : विषय पत्रिकेवर चर्चा करावी विषय क्र.१ पासून सुरूवात करावी.

**विषय क्र. ४१३/१ :**

दिनांक २०.०७.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

श्री.भगवान रगडे : विषयावर चर्चा न होता प्रस्ताव मंजूर केले जातात. असे असेल तर स.सदस्यांना बोलविता कशासाठी.चर्चा न होता विषय मंजूर करण्यात आलेले आहे.

श्री.सुरजितसिंग खुंगर : ऐनवेळचे कोणतेही प्रस्ताव घेण्यात येऊ नये म्हणून माजी सभापती प्रशांत देसरडा यांनी सुचविले होते. ऐनवेळचे ठराव का घेण्यात आले. चर्चा झालेली नाही.सभागृहाची निव्वळ दिशाभूल होत आहे.नियम काय आहे वाचून दाखवावे. प्रस्ताव मंजूर करून निर्णय घेण्याची काय पध्दत असते. असे होऊ नये.

श्री.भगवान रगडे : सर्व प्रस्ताव आपणांस पारित करून घ्यायचे असतांत तर आम्हाला कशासाठी बोलविण्यात येते. असा प्रश्न निर्माण होतो. स.सदस्यांना प्रत्येक विषयावर बोलण्याची संधी दिली पाहिजे. चर्चा झाली पाहिजे. चर्चा करण्यास तयार नसेल तर तरच त्याबाबतीत काय निर्णय घ्यायचा हे सभागृहाचे मत जाणून घेतले पाहिजे. असे माझे मत आहे. ऐनवेळी सत्यम सिनेमा बाबतचा प्रस्ताव घेवून मंजूर केला कोणतीही चर्चा झालेली नाही व चर्चा न झालेले सर्व प्रस्ताव रद्द करण्यांत यावे.

श्री. सुरजितसिंग खुंगर :प्रस्ताव मंजुर करण्याची पध्दत नियम काय आहेत सचिवाकडुन माहिती घ्यावी लोकशाही पध्दतीने कामकाज होत नाही.चर्चा न होता ऐनवेळचे सर्व प्रस्ताव मंजूर करणे बेकायदेशीर आहे.स.सदस्यांना त्यांची प्रत दिली जात नाही.

श्री.किशनचंद तनवाणी : इतिवृत्तामध्ये जे ऐनवेळी प्रस्ताव/ठराव घेतलेले आहे ते प्रशासकीय ठराव आहेत. विषय क्र.१ वर चर्चा करायची आहे. त्याबाबतच चर्चा करावी. प्रशासकीय ठराव ऐनवेळी आजपर्यंत घेतलेले आहेत. काही ठरावाबाबत शासनाकडे पाठपुरावा करून कार्यवाही करण्याची गरज पडते.

श्रीमती शाहीन जफ़र : ऐनवेळी ठराव मंजूर होतात. स.सदस्यांना माहिती नसते. इतिवृत्तात येतात. कोणतीही चर्चा होत नाही. हे बरोबर नाही.

श्री.सुरजितसिंग खुंगर : नियमाने सभेचे कामकाज चालावे. अशी मागणी आहे.

श्री.रतनकुमार पंडागळे : विषय क्र.१ मध्ये इतिवृत्तातील पान क्र.१७ वर जो कामगारांच्या बाबतीत प्रस्ताव ठेवलेला होता त्यात दुरूस्ती अशी करायची की, हे शहर वाढते आहे. कामगारांच्या सेवेची गरज आहे व हा कामगाराचा प्रश्न असल्यामुळे शासनाचे निर्णय दि.१०.११.२००३ त्यातील जी अट आहे ती शिथिल करून दुरूस्तीसह प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.तकीहसन खॉन : ऐनवेळचे प्रस्ताव चर्चा न करता कसे मंजूर केले.

श्री.किशनचंद तनवाणी : सभा चालु होती विषय समोर आले. चर्चा करावी म्हणून मा.महापौरांनी सूचना केली होती. विषयावर चर्चा न करता इतर बाबींवर मोठमोठ्याने चर्चा होत होती. विषय क्र.१ मंजूर करावा.

मा.महापौर : विषय क्र.१ दुरूस्तीसह मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

दिनांक २०.०७.२००४ च्या सभेतील ठराव क्र.३९६/२ मध्ये '' औरंगाबाद शहर हे वाढते शहर आहे. या शहरात कामगारांच्या सेवेची गरज आहे आणि हा कामगारांचा प्रश्न असल्यामूळे दिनांक १०.११.२००३ च्या शासन निर्णयातील जी अट आहे ती शिथिल करण्यांत यावी '' अशी वाढ करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. या दुरूस्तीसह दिनांक २०.०७.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**चर्चा :**

श्री.भगवान रगडे : ऐनवेळच्या विषयाच्या संदर्भात खुलासा करण्यात यावा.

श्री.सुरजितसिंग खुंगर : विषय चर्चा करूनच पास करायचे असतात. परंतु चर्चा होत नाही.

श्री.मीर हिदायत अली : विषय पत्रिका नंतर घेण्यात यावी. चर्चेसाठी वेळ देण्यात यावा.

(याच वेळी मा.महापौर यांचे डायस समोर जाऊन स.सभासद मोठमोठ्याने बोलतात. काहीही ऐकू येत नाही.)

श्री.किशनचंद तनवाणी : सर्व स.सभासद आपआपल्या जागेवर बसले तर योग्य ती चर्चा करून निर्णय घेता येईल.

श्री.संजय सिरसाट : सदस्य गोंधळ थांबवित नसतील तर सदस्यत्व रद्द करायची रूलींग द्यावी.

श्री.सुरजितसिंग खुंगर : चर्चा करण्यासाठी विनंती करण्यात येत आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : सभागृहात चर्चा होईल. पहिल्यांदा खाली बसवा. महिला महापौर आहेत म्हणून गोंधळ होते बरोबर नाही.

श्री. संजय सिरसाट : एक दिवसांचे सदस्यत्व रद्द करावे . ऐकायची तयारी नसेल तर एक दिवसाचे सदस्यत्व रद्द करावे.

मा.महापौर : सर्व स.सभासदांनी आपआपल्या जागेवर बसावे नसता सभासदत्व रद्द करण्यात येईल.

श्री.सुरजितसिंग खुंगर : लोकशाही मार्गाने मागणी होत आहे. खुलासा करावा.

याच वेळी स.सभासद मो.जावेद मो.इसहाक यांनी मा.महापौर यांचे डायस समोरील राजदंड आढतात. सुरक्षा रक्षक त्यांना थांबवितात. यावेळी मोठमोठ्याने स.सभासद बोलत होते.

मा.महापौर : सर्व स.सभासदांनी आपआपल्या जागेवर बसावे. तरच विषयपत्रिकेवरील चर्चा करण्यात येईल. वारंवार सुचना करूनही स.सभासद जागेवर बसत नाही मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही स.सभासद श्री.मो.जावेद मो.इसहाक यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यात येत आहे. त्यांनी बाहेर जावे. (यावेळी सभागृहात गोंधळ चालुच असतो.)

श्री.किशनचंद तनवाणी : स.सभासद श्री.जावेद कुरैशी यांचे सभासदत्व रद्द करण्यात आलेले आहे. त्यांना सभागृहा बाहेर जाण्यास सांगावे.

मा.महापौर : श्री.जावेद कुरैशी यांनी स्वत:हून बाहेर जावे. (याच वेळी मा.महापौरांच्या आदेशानुसार पोलिस कर्मचारी सभागृहात येतात. वेळ दुपारी १.१० वाजता.)

सौ.निखत परवीन : आपण या सभागृहाचे अध्यक्ष व शहराचे प्रथम नागरीक आहात. एकदा चर्चा करण्याचा निर्णय घेतल्यास चर्चाच करण्यात यावी. विषय पत्रिका नाही. नियमाप्रमाणे कामकाज चालवावे आपले जे अधिकार आहे ते वापरले पाहिजे. दुसऱ्यावर अवलंबून का राहाता असे कामकाज करावयाचे असेल तर आपल्या कॅबीनमध्ये बैठक घ्यावी. ऐनवेळी सर्व विषय मंजूर होतात अशी एकतर्फ़ी निर्णय घ्यायचे असेल तर आपण आपल्या कॅबीनमध्ये बसू घ्यावे.

श्री.तकीहसन खॉन : चुक आपण कराल शिक्षा दुसऱ्यांना कशासाठी.

श्रीमती शाहीन जफ़र : सर्व नागरीक अशा कामकाजामुळे बाहेर हसतात यात महानगरपालिकेची बदनामी होते. जे मनात येईल तोच निर्णय घेत आहात.

श्री.भगवान रगडे : पोलिसांना पाचारण करण्याची गरज नाही. महानगरपालिका सक्षम आहे. आपआपसातील वाद आहे. पोलिस येण्याची पहिलीच वेळ आहे. त्यांना बोलावू नये.

श्री.किशनचंद तनवाणी : मो.जावेद मो.इसहाक यांना सभागृहा बाहेर जाण्याचे मा.महापौरांनी आदेशीत केलेले आहे. त्यांनी सभागृहा बाहेर जावे.

(याच वेळी स.सभासद श्री.मो.जावेद मो.इसहाक हे सभागृहाबाहेर जातात वेळ दुपारी १.२० वाजता.)

श्री.तकीहसन खॉन : नियमाला धरून सभेचे कामकाज व्हावे स.सभासद जी मागणी करीत होते ती योग्य की अयोग्य याची शहानिशा झाली पाहिजे. सदस्यांची यात काहीही चूक नाही.

श्रीमती शाहीन जफ़र : संपूर्ण शहराचे आपण महापौर आहात. आपण प्रथम नागरीक आहात. वाटेल तो निर्णय आपण घेत आहात हे बरोबर नाही. स.सभासद मो.जावेद मो.इसहाक यांना पुन्हा सभागृहात येण्याची परवानगी द्यावी. सभासदत्व रद्द केलेला निर्णय मागे घेण्यात यावा.

**विषय क्र. ४१४/२ :**

मुख्य लेखापरिक्षक प्रस्ताव सादर करीत आहेत की, लेखापरिक्षण विभागामार्फ़त महानगरपालिकेच्या सर्व विभागांचे लेखापरिक्षण हाती घेण्यासाठी मागील ५-६ वर्षापासून वार्षिक लेखापरिक्षण कार्यक्रम तयार करण्यात येतो व त्यानुसार त्या त्या वेळी विभागाने उपलब्ध करून दिलेल्या अभिलेख्यांआधारे लेखापरिक्षण करण्यात येते. लेखापरिक्षणादरम्यान निदर्शनास आलेल्या आक्षेपार्हबाबी अर्धसमास स्वरूपात विभाग प्रमुख /शाखा प्रमुख यांचेकडे कळविण्यात येऊन पुर्तता करण्याचे सूचित करण्यात येते किंवा तीव्र आक्षेपार्ह बाबी या मा.आयुक्त यांच्या निदर्शनास आणून देण्यात येऊन त्यावर यथोचित कार्यवाही करण्याची सुचना प्रशासनास देण्यात येते.

आर्थिक वर्ष संपल्यानंतर सर्व आक्षेपार्ह बाबी किंवा इतर अनियमिततांबाबत मा.स्थायी समितीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०६ (३) अन्वये अहवाल सादर करण्यात येतो.

सन २००३-०४ चे सुधारित अंदाजपत्रक रू.१३६.८० कोटी इतके असून जमा व खर्च अशा दोन्ही बाजूंनी १००% लेखापरिक्षण केल्यास सुमारे रू.२७३.६० कोटीचे लेखापरिक्षण करावे लागणार आहे. सध्या अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे १००% लेखापरिक्षण करणे शक्य होत नाही. त्यामुळे काही विभागांचे १००% तर काही विभागांचे चाचणी लेखापरिक्षण करावे लागते. यामुळे काही महत्वाच्या बाबी

चाचणी लेखापरिक्षणा दरम्यान पूर्णपणे निदर्शनास येत नाहीत. यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग लेखापरिक्षणासाठी उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे. सध्या लेखापरिक्षण विभागात खालील प्रमाणे वर्ग-३ ची पदे मंजूर आहेत.

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पद संख्या |
|---|---|---|
| १ | वरीष्ठ लेखापरीक्षक (कार्यालय अधिक्षक संवर्ग) | १ |
| २ | कनिष्ठ लेखापरीक्षक (वरिष्ठ लिपिक संवर्ग) | ४ |
| ३ | कनिष्ठ लिपिक | ४ |
| ४ | वाहन चालक | १ |
| ५ | शिपाई | २ |

प्रस्तावित नुसार जमा बाजुच्या लेखापरिक्षणासाठी कार्यालय अधिक्षक अधिकाऱ्याच्या अधिनस्त एक पथक व खर्च बाजुसाठी त्यापेक्षा थोडे मोठे पथक खालील प्रमाणे असावे अशी शिफ़ारस करण्यात येते.

अ) **जमा बाजू:**

| अ.क्र. | पदांचे नांव | वेतन श्रेणी | संख्या |
|---|---|---|---|
| १ | लेखापरिक्षा अधिक्षक<br>(कार्यालय अधिक्षक संवर्ग) | रू.५५०० -९००० | १ |
| २ | वरिष्ठ लेखापरिक्षक (वरिष्ठ लिपिक संवर्ग) | रू.४५००- ७००० | ४ |
| ३ | कनिष्ठ लेखापरिक्षक (क.लिपीक संवर्ग) | रू. ३०५०-४५९० | ८ |
| ४ | शिपाई | रू.२५५०-३२०० | १ |
| | एकूण | | १४ |

ब) **खर्च बाजू :**

| अ.क्र. | पदांचे नांव | वेतन श्रेणी | संख्या |
|---|---|---|---|
| १ | लेखापरिक्षा अधिक्षक<br>(कार्यालय अधिक्षक संवर्ग) | रू.५५०० -९००० | १ |
| २ | वरिष्ठ लेखापरिक्षक (वरिष्ठ लिपिक संवर्ग) | रू.४५००- ७००० | ६ |
| ३ | कनिष्ठ लेखापरिक्षक (क.लिपीक संवर्ग) | रू. ३०५०-४५९० | १२ |
| ४ | शिपाई | रू.२५५०-३२०० | १ |
| | एकूण | | २० |

क) **कार्यालयीन कर्मचारी :**

| अ.क्र. | पदांचे नांव | वेतन श्रेणी | संख्या |
|---|---|---|---|
| १ | लघुलेखक/ संगणक ऑपरेटर | रू.४५०० -७००० | १ |
| २ | लिपीक / टंकलेखक | रू.३०५०-४५९० | १ |
| ३ | वाहन चालक | रू.३०५०-४५९० | १ |
| ४ | शिपाई | रू.२५५०-३२०० | १ |
| | एकूण | | ४ |

एकूण :- अ + ब + क = १४ +२०+४ = ३८

या प्रमाणे प्रस्तावित कर्मचारी वर्ग लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झाल्यास लेखापरिक्षणाचे कामकाज अत्यंत प्रभावीपणे पार पाडता येईल. त्यामुळे सध्याची मंजूरपदे वजा जाता खालील प्रमाणे

नविन पद निर्मिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) अन्वये प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतन श्रेणी | एकूण प्रस्तावित पदे | सध्याची मंजूरपदे | नविन निर्माण करावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | लेखापरिक्षा अधिक्षक (कार्यालय अधिक्षक संवर्ग) | रू.५५००-९००० | २ | १ | १ |
| २ | वरिष्ट लेखापरिक्षक (वरिष्ठ लिपीक संवर्ग) | रू.४५००-७००० | १० | ४ | ६ |
| ३ | लघुलेखक/संगणक ऑपरेटर | रू.४५००-७००० | १ | -- | १ |
| ४ | कनिष्ठ लेखापरिक्षक (कनिष्ठ लिपीक संवर्ग) | रू.३०५०-४५९० | २१ | ४ | १७ |
| ५ | वाहन चालक | रू.३०५०-४५९० | -- | १ | -- |
| ६ | शिपाई | रू.२५५०-३२०० | ३ | २ | १ |
| | एकूण | | ३७ | ११ | २६ |

(ड) **वाढीव खर्च :**

लेखा विभागाकडील आकडेवारी नुसार सन २००३-०४ या आर्थिक वर्षातील एकूण महसूली उत्पन्न (अनुदान वगळता) रू.१०२.०७ कोटी इतके असून एकूण आस्थापना खर्च रू.४०.०१ कोटी इतका आहे. महसूली उत्पन्नाशी एकूण आस्थापना खर्चाची टक्केवारी ३९.१९% आहे. सदरील प्रस्तावित पदांवरील वार्षिक अपेक्षित खर्च रू.१८.६४ लक्ष इतका गृहीत धरल्यास आस्थापना खर्च ०.१८ % वाढेल व एकूण आस्थापना खर्च ३९.३७% पर्यंत होईल म्हणजेच मर्यादेच्या आत राहील.

लेखापरिक्षणाचे काम हे बरेचसे तांत्रिक स्वरूपाचे असून व ज्यांना लेखापरिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव आहे अशा कर्मचाऱ्यांकडून करून घेणे अत्यंत गरजेचे आहे असे आवर्जून नमूद करण्यात येते.

लेखापरिक्षण विभागासाठी वरिल प्रमाणे २६ पदे निर्मितीबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती सभा ठराव क्र.३४ दिनांक २४.६.२००४ अन्वये मंजूर करण्यात आला आहे.

करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१ (४) अन्वये प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

सौ.निखत परवीन : या पदासाठी काय अर्हता आहे. पद भरण्याची काय पध्दत आहे. कधी नामनिर्देशनाने तर कधी पदोन्नतीने. २ पदे आहेत एक जमा बाजू व खर्च बाजूचे कामकाज करण्यासाठी असे वेगवेगळे कर्मचारी आवश्यक असल्याचे नमुद आहे. परंतु कायद्यात अशी कुठेही तरतुद नाही. इतरही कर्मचारी काम करू शकतात. टेक्नीकल कर्मचारीच आवश्यक आहे अशी आवश्यकता नाही. प्रस्ताव स्थगित ठेवावा. शासनाचे नियम नाहीत.

सौ.सिद्यीकी नईम सुलताना म.फ़सीयोद्यीन : महापालिकेत सिनीयर कर्मचारी काम करतात. त्यांना या पदावर घेण्याबाबत संधी दिली पाहिजे.

श्री.भागवत कराड : विषय क्र.२ बाबत प्रशासनाकडून खुलासा करण्यात यावा.

श्री.सुरजितसिंग खुंगर : ऑपरेटरसाठी व इतर पदासाठी पात्रता काय असावी. डिटेल काहीही दिलेले नाही.

सौ.निखत परवीन : यापूर्वी श्री.पाटणी यांना हे पद दिलेले होते. दोन वर्षापूर्वी त्यांना लेखापरिक्षण विभागात व नंतर भांडार विभागात देण्यात आले. त्यांना भांडार विभागात का देण्यात आले. ते पदोन्नतीने दिले का नामनिर्देशनाने दिले आहे.

श्री.सुरजितसिंग खुंगर : कोणत्याही पदासाठी काय पात्रता असावी नमुद केलेले नाही. वरील जो खर्च दाखविण्यात आला तो समावेश करावा लागणार की नाही याचाही खुलासा करावा. शैक्षणिक पात्रतेबाबत काहीही दिलेले नाही. अनुभव किती वर्षाचा आवश्यक पाहिजे ते सुध्दा नमुद नाही.

मा.महापौर : मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : प्रस्तुत प्रस्ताव हा लेखा परीक्षक विभागामध्ये नवीन पद निर्माण करण्याचा आहे. मुख्यलेखा परीक्षक या विभागात सध्या १२ कर्मचारी आहेत. त्यातही शिपाई व वाहन चालक वगळून फ़क्त ९ कर्मचारी कार्यालयीन काम करतात. मुख्यलेखा परीक्षकाची जबाबदारी ही संपूर्ण महानगरपालिकेचे ऑडीट करण्याची असते. इतर महानगरपालिकेमध्ये मुख्यलेखा परीक्षक विभागात ४०-५० कर्मचाऱ्यांचा स्टॉफ़ कार्यरत आहे. बऱ्याच दिवसापासूनची या विभागात कर्मचारी जास्तीचे असावे म्हणून मागणी होती. त्याकरीता नवीन पदे निर्माण करणे गरजेचे आहे. सध्या कार्यरत असलेले ९ कर्मचारी हे पुरेसे होत नाही. महानगरपालिकेची सेवा भरती नियम तयार आहे. कोणत्या पदासाठी कोणती शैक्षणिक अर्हता असावी, पदोन्नतीने भरावे की, नामनिर्देशनाद्वारे भरावे हे सर्व सेवा भरती पुस्तकात दिलेले आहे. ही पदे भरणे आवश्यक आहे. म्हणून या प्रस्तावास मान्यता द्यावी अशी विनंती आहे. सेवा भरती नियम पुस्तक शासनाने १९९४ मंजूर केलेले आहे. ही पदे शासनाने मंजूर केल्यानंतर सेवा भरती नियमाप्रमाणे विभाग भरती करण्या संदर्भात कार्यवाही करणार आहे.

श्री.भागवत कराड : कोणत्या पदासाठी काय शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. यासाठी सेवा भरती पुस्तकात सर्व नमुद आहे. ते पुस्तक पाहावे असे प्रशासनाचे मत आहे. या पदांना पद निर्मिती म्हणून मंजूरी द्यायची आहे. परंतु पुढील सर्वसाधारण सभा होण्या अगोदर सर्व स.सदस्यांना सेवाभरती पुस्तिका देण्यात यावी. जेणे करून या प्रस्तावा बाबतची माहिती मिळेल.

मुख्यलेखाधिकारी : सेवा भरती नियमावलीच्या प्रती सर्वांना वितरीत केलेले आहे. १९९४ मध्ये जे नियम तयार केले तेच आहे. थोडाफ़ार बदल झाला असेल या पदनिर्मितीचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर शासनाकडे पाठवून त्यास मंजूरी आल्यानंतर भरतीची कार्यवाही होईल.

श्री.सुरजितसिंग खुंगर : पुर्णपणे प्रस्ताव सादर केलेला नाही अनुभव तसेच शैक्षणिक पात्रतेचा उल्लेख नाही.

श्री.संजय सिरसाट : प्रस्ताव उपआयुक्त (प्र) यांचे मार्फ़त का सादर झालेला नाही. हा प्रस्ताव चांगला असला तरी जे कर्मचारी मुख्यलेखा परीक्षक विभागात १५-१५ वर्षापासून काम करीत आहे त्याचा विचार करण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी : मुख्यलेखा परीक्षक यांचे स्वतंत्र अस्तित्व बी.पीएमसी ॲक्ट नुसार दिलेले आहे. हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेने मंजुर केल्यानंतर प्रशासनाकडे शिफ़ारस केला जाईल. कलम १०६ (३) खाली मुख्य लेखा परीक्षक यांना स्वतंत्र अधिकार आहेत.

श्री.संजय सिरसाट : मुख्यलेखा परीक्षक यांनी दर आठ दिवसाचा लेखापरीक्षणाचा अहवाल सर्वसाधारण सभा स्थायी समिती सभेकडे दिला पाहिजे. आतापर्यंत दिलेला नाही यास कारणीभूत कोण आहे.

मुख्यलेखाधिकारी : माझ्याकडे मुख्यलेखा परीक्षक पदाचा चार्ज दिल्यापासून दर आठ दिवसाला अहवाल सादर करीत आहे. ज्या त्या काळात अहवाल दिला नसेल ते ते मुख्यलेखा परीक्षक त्यास जबाबदार राहतील.

श्री.संजय सिरसाट : यापूर्वी जे जे मुख्यलेखा परीक्षक म्हणून यायचे व कमेटीचे सदस्य होते. काही कर्मचाऱ्यांच्या चौकश्या चालु आहेत. पंरतू जी कार्यपध्दती यापूर्वी चालू होती ती सभागृहासमोर आली पाहिजे. मुख्यलेखा परीक्षकांना अहवाल देणे बंधनकारक आहे. तो का दिला जात नाही याचा खुलासा करण्यात यावा.

मुख्यलेखाधिकारी : कलम १०५ नुसार साप्ताहिक अहवाल स्थायी समिती समोर ठेवणे आवश्यक आहे. माझ्याकडे जेव्हा पासून चार्ज आलेला आहे तेव्हापासून साप्ताहिक अहवाल दिला जातो. त्यापूर्वी ज्यांचेकडे या पदाचा चार्ज होता. त्यांनी हा विभाग सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न केलेला नाही. माझ्याकडे चार्ज आल्यानंतर या विभागात ८-९ कर्मचारी संपूर्ण काम करू शकत नाही ले लक्षात आल्यामुळे हा प्रस्ताव सादर केलेला आहे. एकूण ३७ कर्मचारी आवश्यक आहे.

श्री.रतनकुमार पंडागळे : डॉ.देशपांडे माजी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचा लेखा परीक्षणाचा अहवाल दिलेला आहे काय .

श्रीमती निखत परवीन : श्री.महावीर पाटणी यांना या विभागात नियुक्ती केलेली होती. या पदाची आवश्यकता होती तर त्यांना भांडार विभागात का पाठविण्यात आले.

श्री.रतनकुमार पंडागळे : डॉ.देशपांडे यांचा लेखा परीक्षणाचा अहवाल आलेला आहेत का. आतापर्यंत का दिलेला नाही.

मुख्यलेखाधिकारी : त्यावेळी जे मुख्य लेखा परीक्षक म्हणून पदावर कार्यरत होते. ती त्यांची जबाबदारी होती. त्यावेळेसचा खुलासा मी करू शकणार नाही.

श्री.मीर हिदायत अली : श्री.जावेद कुरैशी यांचे एक दिवसासाठी सदस्यत्व रद्द केले ते परत घ्यावे व त्यांना सभागृहात बसण्याची परवानगी द्यावी.

श्री.भागवत कराड : विनंती करण्यात येते. मागणी मंजूर करावी.

मा.महापौर : श्री.जावेद कुरैशी यांना येण्याची परवानगी देण्यात येते.

(याच वेळी स.सभासद मो.जावेद महंमद ईसहाक हे सभागृहात येऊन बसतात.)

श्री.सुरजितसिंग खुंगर : कार्यालयीन कर्मचारी यामध्ये लघुलेखक/संगणक ऑपरेटर असे नमुद केले. संगणक ऑपरेटरसाठी शैक्षणिक पात्रता काय असावी. नियमावलीमध्ये नाही.

उपआयुक्त (प्र) : अधिनियमाच्या कलम ५१ (४) प्रमाणे पद निर्मितीचा प्रस्ताव असून श्री.पाटणी यांना भांडार विभागामध्ये भांडारपाल म्हणून नियुक्ती केलेली आहे. स्थायी समितीच्या मंजुरीने तसा प्रस्ताव मंजूर झालेला होता.

श्री.भागवत कराड : विषय क्र.२ फ़क्त पद निर्मितीचा तो प्रस्ताव आहे. त्यास मंजुरी द्यायची आहे. शैक्षणिक पात्रता व अनुभव काय असावा हे सेवा भरती नियमावलीमध्ये दिलेले आहे. हा प्रस्ताव मंजूर केल्यानंतर शासनाकडे जाणार आहे. शासनाने मंजूरी दिल्यानंतर भरती बाबत कार्यवाही होईल. प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.गाजी सादोद्दीन : विषय क्र.२ वर सविस्तर चर्चा करण्यात यावी. प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर शासनाकडे जाणार आहे. सेवा भरती पुस्तिका आमच्याकडे नाही. या सर्व पदासाठी पात्रता पुस्तिकेत नमुद आहे का ?

श्री.सुरजितसिंग खुंगर : संगणक ऑपरेटर साठी शैक्षणिक पात्रता काय असावी.

उपआयुक्त (प्र) : या सर्व पदांबाबत सेवा भरती पुस्तिकेत शैक्षणिक पात्रता आहे. संगणक ऑपरेटरसाठी शासन निर्णयानुसार एम.एस.सी.आय.टी. परीक्षा पास असणे

बंधनकारक आहे व ज्या ज्या वेळी शासन बदल करेल त्या त्या नुसार सेवा भरती नियमात बदल करून कार्यवाही होईल.

सौ.निखत परवीन जैदी : या विषयाला स्थगिती द्यावी. माझी हरकत आहे.

मा.महापौर : विषय क्र.२ मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लेखापरिक्षण विभागासाठी प्रस्तावित २६ पदे निर्मितीबाबतच्या प्रस्तावास मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१५/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन निर्णय वित्त विभाग दि.५ मार्च,२००३ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने मुख्य लेखा परिक्षक पाठविण्यात आले होते. दिनांक १९.३.२००३ च्या मा.सर्व सर्वसाधारण सभेमध्ये श्री.बनसोडे श.वि. यांचा प्रतिनियुक्तीचा प्रस्ताव रद्द करण्यात आला व दिनांक २०.१२.२००२ च्या मा.सर्व साधारण सभेतील ठराव क्र.१५/५ अन्वये सदरील पद हे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही एका महिन्याच्या आत पूर्ण करून प्रस्ताव सभेपुढे ठेवण्यास मान्यता दिली.

शासन निर्णय क्रमांक एएमसी - १४२००२/प्र.क्र.९७/०२/नवि-२४ दिनांक १७ मे २००३ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवर मुख्य लेखा परिक्षक हे पद प्रतिनियुक्तीने न भरता महानगरपालिका आस्थापनेवर पदोन्नतीने भरण्यास मान्यता दिली होती. तथापि, महानगरपालिका आस्थापनेवर लेखाधिकारी संवर्गात एकच अधिकारी असून त्यांची अर्हता ही सेवा भरती नियमातील तरतूदीप्रमाणे नसल्याने प्रकरणांमध्ये निर्णय झाला नाही. मुख्य लेखा परिक्षक हे पद प्रदीर्घ काळापासून रिक्त असून, या पदाचा अतिरिक्त कार्यभार महानगरपालिकेचे मुख्य लेखाधिकारी यांचेकडे मार्च २००३ पासून देण्यात आलेला आहे. मुख्य लेखा परिक्षक हे पद संवैधानिक असून,सदर पदावर नियमतीत स्वरूपाचा अधिकारी असणे आवश्यक आहे. मुख्य लेखा परिक्षक हे पद शासनाच्या वित्त विभागातील सक्षम अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरणे आवश्यक आहे.

करिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेसाठी सादर.

श्री.भगवान रगडे : विषय क्र.३ यावर अभ्यास करावयाचा आहे. तुर्त हा प्रस्ताव स्थगित करण्यात यावा.

मा.महापौर : विषय क्र.३ स्थगित करण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**विषय क्र. ४१६/४ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी सिडको व शहराच्या विस्तारीत भागाच्या रूपये ६७.३० कोटी किमंतीच्या योजनेच्या टप्पे निहाय पुनर्र बांधणी संदर्भात, योजनेतील टप्पा-१ (योजनांचे सशक्तीकरण) संदर्भात रूपये ७१४.०० लाखाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सर्वसाधारण सभे समोर सादर केला आहे. सदर टप्पा -१ योजनेची वैशिष्टे खालील प्रमाणे सादर.

✻ सिडको व शहराच्या विस्तारीत भागाची रूपये ६७.३० कोटी किमंतीची २०८.२० द.ल.ली. क्षमतेची योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने सन १९९७-९८ मध्ये संकल्पीत करून या योजनेस सन १९९८ मध्ये प्रशासकीय मान्यता प्राप्त करून घेतली होती. योजनेच्या वित्तीय आकृती बंधामध्ये (सुधारीत आकृती बंधात) रूपये ४७११.०० लाख बाह्य कर्ज उभारावे असे नियोजीत असल्याने महानगरपालिकेतर्फे हुडको ह्या वित्तीय संस्थेकडे सातत्याने ४ ते ५ वर्ष पाठपुरावा करून रूपये ४४००.०० लाखाच्या कर्जास मंजुरी प्राप्त करून घेतली, परंतु वित्तीय

संस्थेच्या जाचक अटी शर्ती मुळे आज कर्ज मिळण्याची शक्यता नसल्याने योजना गेल्या सहा वर्षा पासुन रेंगाळली आहे.

✻ योजने संदर्भात महानगरपालिका कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) व मुख्य लेखाधिकारी यांनी अभ्यास केला व त्या संदर्भाने मा.आयुक्त महोदयांकडे टिपणी सादर केली. कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) व मुख्य लेखाधिकारी यांच्या टिपणी व निष्कर्षास मा.आयुक्त महोदयांनी मान्यता दिली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आकारलेल्या ई.टी.पी., किरकोळ खर्च व आस्थापनेच्या अतिरिक्त भाराच्या (एकूण रक्कमेच्या २४.५०%) बाबीचा विचार करून सदर योजना महानगरपालिकेतर्फे राबविल्यास योजनेत रूपये १९ ते २० कोटीचा आर्थिक फायदा होईल. त्यामुळे महानगरपालिका सर्व साधारण सभेत दिनांक १९.०६.२००३ च्या बैठकीत विषय क्र.८४/२ अन्वये ठराव पारीत करून पुढील योजना महानगरपालिके तर्फे राबविण्यात येईल असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. या संदर्भात मा.सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांना दिनांक १६.०१.२००३ व २३.०३.२००४ रोजीच्या बैठकीत अवगत करण्यात आले होते.

✻ रूपये ६७.३० कोटी किमंतीच्या योजनेत एकुण संकल्पीत विसर्ग नव्या योजनेतून १६५.०० द.ल.ली. व जुन्या योजनेतून ४३.२० द.ल.ली. असा एकुण २०८.२० द.ल.ली. संकल्पीत केला गेला. परंतु जर सध्याच्या योजनांचे मजबुतीकरण केल्यास (जुने पंप बदलणे, नव्या योजनेतील पंपाची दुरूस्ती करणे, जलवाहिन्याच्या उपागांची सुयोग्य कामे करणे वगैरे) आजच्या ४२.०० द.ल.ली. विसर्गात १०.०० ते १५.०० द.ल.ली. पाणी विसर्गाची वृध्दी होईल व त्यामुळे शहराची वाढीव गरज काही काळ पूर्ण करणे शक्य होईल.

या संदर्भातच टप्पा-१ (२००४-२००५ वर्षा करीता ) मध्ये रूपये ७१४.०० लाखांचा प्रस्ताव सादर केला असून, दिनांक ३०.०६.२००४ रोजी मा.महापौर, सौ.रूख्मिणीताई शिंदे, मा.उपमहापौर,सौ.साधना सुरडकर, मा.सभापती (स्थायी समिती), श्री.नंदकुमार घोडेले, मा.सभागृहनेता, श्री.किशनचंद तनवाणी, मा.विरोधी पक्षनेता, श्री.मिर हिदायत अली, तसेच मा.आयुक्त यांचे बरोबर उद्भवाची पाहणी करून प्रत्यक्ष मोक्यावर मा.आयुक्त व सर्व स.पदाधिकारी यांनी सुचीत केले की, औरंगाबाद शहराचा वाढीव पाणी पुरवठा टप्पा-१ अंतर्गत करावयाच्या कामासाठीच्या रूपये ७१४.०० लाखाचा प्रस्ताव स्थायी समिती समोर अर्थ संकल्पात तरतुद उपलब्ध करण्यासाठी मंजुरीस्तव सादर करावा. त्या नुसार मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करण्यात आला. त्यास मा.स्थायी समितीने विषय क्र.४९ अन्वये दिनांक १२.०७.२००४ च्या बैठकीत टप्पा-१ च्या रूपये ७१४.०० लाखाच्या प्रस्तावास मान्यता दिली.

पाण्याची वाढती मागणी, भविष्यातील पाणी नियोजन, प्राप्त परिस्थिती विचारात घेता टप्पा-१ च्या रूपये ७१४.०० लाखाच्या पुनर्र बांधणी मधील उपांग निहाय कामाचा तपशिल खालील प्रमाणे सादर.

| **अ.क्र.** | **तपशील** | **अंदाजपत्रकीय रक्कम रूपये** |
|---|---|---|
| | **भाग-अ, स्थापत्य कामे** | |
| १. | ७०० व १४०० मी.मी.व्यासाच्या जलवाहिन्यावर जायकवाडी ते क्रांतीचौक दरम्यान एयर व्हॉल्व बसविणे. | २२,८४,०००/- |
| २. | ७०० व १४०० मी.मी. व्यासाच्या जलवाहिन्यावर जायकवाडी ते क्रांतीचौक दरम्यान स्कोर व्हॉल्व बसविणे. | ११,५३,२००/- |
| ३. | जायकवाडी येथील जुन्या उद्भवावर सर्ज अरेस्टर साठी पर्यायी व्यवस्था करणे. | २,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ४. | जायकवाडी येथील नवीन उद्भवावर स्लुस व्हॉल्व व नॉन रिटर्न व्हॉल्व बदलणे. | ८,३८,४००/- |
| ५. | ७०० व १४०० मी.मी.व्यासाच्या जलवाहिन्यावर विविध व्यासाचे स्लुस व्हॉल्व पुरविणे व बसविणे. | ६,६४,५००/- |
| ६. | ढोरकीन बुस्टर येथे संरक्षीत भिंत व स्वच्छता गृह बांधणे. | ३,१३,१००/- |
| ७. | जलशुध्दीकरण केंद्र फारोळा (जुना) येथे फिल्टर बेडची सुधारणा करणे. | ४०,५२,०००/- |
| ८. | जलशुध्दीकरण फारोळा ते अलाना फॅक्टरी ३०० मी.मी. व्यासाची पाईप लाईन नवीन टाकणे. | १,३४,८२,०००/- |
| ९. | १४०० मी.मी.व्यासाच्या गुरूत्व वाहिनीवर व्हॉल्व व त्यासाठी चेंबर बांधणे. | २६,८६,७००/- |
| १०. | नक्षत्रवाडी बुस्टर येथे भांडार गृह बांधणे. | २,६०,०००/- |
| ११. | जायकवाडी उद्भव येथे जोड रस्ता,तारकुंपन व गेट दुरूस्ती करणे. | ४,५०,५००/- |
| | **(भाग 'अ') एकुण रूपये** | **२,६३,८५,२००/-** |
| | **भाग-ब, यांत्रिकी कामे** | |
| १. | जायकवाडी जुने पंपगृह येथे ४०० अ.श.पंप संच पुरविणे,बसविणे. | ९३,२३,२००/- |
| २. | जायकवाडी नवीन पंपगृह येथे ४९० अ.श.पंपासाठी बाहुल असेंब्ली पुरविणे व बसविणे. | ५६,५०,४००/- |
| ३ | ढोरकीन पंपगृह येथे ३५० अ.श.पंप पुरविणे व बसविणे. | ४९.६८.७३०/- |
| ४ | जुना फ़ारोळा पंपगृह येथील ४७५ अ.श.पंपाच्या रोटेटींग असेंब्ली बदलणे. | ३७,०६.९८०/- |
| ५ | नविन फ़ारोळा पंपगृह येथील ३५० मी.मी.व्यासाचे स्लुस व्हॉल्व पुरविणे,बसविणे. | ९,९८,७००/- |
| ६ | नविन फ़ारोळा पंपगृह येथे ६७० अ.श.पंपाचे कॉलम पाईप पुरिवणे,बसविणे. | १३,१९,३००/- |
| ७ | नविन फ़ारोळा पंपगृह येथे ३५० अ.श.चा एक पंप संच पुरविणे,बसविणे. | २३,७६,०००/- |
| ८ | नक्षत्रवाडी पंपगृह येथे ३०० अ.श.वॉटर लुब्रीकेटेट पंप संच पुरविणे,बसविणे. | ४५.१०.०००/- |
| ९ | जायकवाडी जुने उद्भवाकरीता ६० अ.श.चे डिवाटरींग पंप संच पुरविणे बसविणे. | ५५,४०,७००/- |
| १० | जायकवाडी नविन उद्भवाकरीता ६० अ.श.डिवाटरींग पंप संच पुरविणे,बसविणे. | ५७,२५,२४०/- |
| ११ | जुना फ़ारोळा पंपगृह येथे ६५ अ.श.चे दोन सेंट्रीफ़्यूगल पंप संच पुरविणे,बसविणे. | ८,९५,५५०/- |
| | **(भाग -ब ) एकुण रूपये** | **४,५०,१४,८००/-** |
| | **एकुण रूपये (भाग अ + ब) २६३.८६+४५०.१४ = ७१४.००** | |

उपरोक्त दर्शविलेल्या उपांग निहाय अंदाजपत्रकीय रक्कमेस (रूपये ७१४.०० लाख ) व कामांना कृपया मान्यता व्हावी. मान्यते नंतर सर्व उपांगाच्या वेगवेगळ्या निविदा बोलविण्यात येऊन कामे करून घेण्यात येतील.

तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.राजेंद्रसिंग जबिंदा :विषय क्र.४ हा महानगरपालिकेच्या फ़ायद्याचा विषय आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने महापालिकेची मोठी रक्कम वाचविली गेली. त्यासाठी सभागृहाच्या वतीने विनंती की, कार्यकारी अभियंता तसेच मा.आयुक्त यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात यावे.

मा.महापौर : विषय क्र.४ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांनी सिडको व शहराच्या विस्तारीत भागासाठी रक्कम रू.७१४.०० लाखाचा यांत्रिकी व स्थापत्य कामांचा एकत्रित प्रस्ताव सादर केलेला आहे, सदर प्रस्तावास व अंदाजपत्रकीय रक्कमेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. तसेच प्रस्तावात उल्लेख केल्यानुसार रू.७१४.०० लाखांच्या वेगवेगळ्या निविदा काढून कामे करावीत, ही कामे करत असतांना रू.७१४.०० लाख अंदाजपत्रकीय रकमेच्या बचती मधुन आवश्यक ती संलग्न कामे गरजेनूसार करून घेण्यासही मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१७/५ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्द नुसार मौजे नक्षत्रवाडी येथील गट क्र.११३/पै. मिळकतधारक आर पटेल एन्टरप्राईजेस तर्फ़े पार्टनर श्री.भरत विरजीभाई पटेल यांनी त्यांच्या उक्त मिळकती मधील विकास योजना १५ मीटर रूंद रस्त्या खालील बाधित क्षेत्र व आरक्षण क्र.S1/D ''गार्डन'' या प्रस्तावीत बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दि. १९.६.२००४ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेस बजावलेली आहे.

अर्जदाराचे उक्त मिळकतीचे बाधित क्षेत्र अंदाजे खालील प्रमाणे आहे.

| प्रस्ताव | बाधित क्षेत्र |
|---|---|
| १५ मीटर रूंद रस्ता | १९५० चौ.मी. |
| आरक्षण क्र. S1/D ''गार्डन'' | २०८० चौ.मी. |

तथापी उपरोक्त आरक्षण खालील विकास योजना अहवाल एकूण बाधित क्षेत्र ३.२० हेक्टर असून मोबदला अंदाजे २.२३ कोटी दर्शविलेला आहे.

अर्जदाराचे वरिल प्रमाणे बाधित क्षेत्र संपादन करून आरक्षणाचा उद्देश सफ़ल होणारा नाही. करिता अर्जदाराने दिलेल्या गट क्र.११३/पै. जागेचे खरेदी सुचना प्रमाणे बाधित क्षेत्राशिवाय गट क्र.११४/पै.बाधित सह संपूर्ण आरक्षणा खालील क्षेत्र संपादन करणे योग्य होईल.

तसेच उक्त आरक्षणाचे बाधित क्षेत्रासाठी मिळकतधारकाने वरिल प्रमाणे खरेदी सुचना दि.१९.६.२००४ रोजी दिलेली आहे. खरेदी सुचना दिनांकापासून सहा महिन्याच्या आत म्हणजे दिनांक १८.११.२००४ पूर्वी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचे कडे पाठविणे आवश्यक आहे.

सबब वरिल प्रमाणे खरेदी सुचना नुसार अर्जदाराचे बाधित क्षेत्र, शिवाय संपूर्ण आरक्षणाखालील बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी व भूसंपादनासाठी लागणाऱ्या खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.नंदकुमार फ़ुलारी : सदरील प्रस्ताव शहर सुधार समिती मार्फ़त पाठविण्यात यावा.

मा.महापौर : हा प्रस्ताव शहर सुधार समिती मार्फ़त सादर करावा.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव शहर सुधार समिती मार्फत सादर करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र. ४१८/६ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे गारखेडा येथील न.भू.क्र.१५७३५/पै मिळकतीमध्ये मंजूर विकास योजनेनुसार १८ मीटर रूंद रस्ता प्रस्तावित असून सदर रस्त्याने मिळकतधारकाचे अंदाजे ६५६.५० चौ.मी.क्षेत्र बाधित आहे. उक्त मिळकती मधून नाला वाहतो. उक्त भागाचा विकास लक्षात घेता १८ मीटर रूंद रस्त्यावर पुलाचे बांधकाम करणे आवश्यक आहे. त्यासाठी मिळकतधारकाची बाधित होणारी जमिन त्वरीत संपादन करणे आवश्यक आहे. कारण मिळकतधारकाच्या बाधित जमिनीच्या दोन्ही बाजुकडील रस्त्याखालील जमिन महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेले आहे. केवळ मिळकतधारकाची ६५६.५० अंदाजे क्षेत्र संपादन करणे आवश्यक असल्याने भूसंपादन कायदा १८९४ चे कलम १७ तातडीचे कलम (Urgency Clause) संलग्न महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व १२९ नुसार भूसंपादन करणेसाठी व त्याकरीता भूसंपादनास लागणारा खर्च अंदाजे रू.१५ लाख (रू.पंधरा लाख) अपेक्षित आहे. करीता वरील प्रमाणे भूसंपादन प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.किशनचंद तनवाणी : विषय क्र.६ मंजूर करण्यात यावा.

मा.महापौर : विषय क्र.६ सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौ.गारखेडा येथिल न.भू.क्र.१५७३५/पै. मंजूर विकास योजनेच्या १८ मी.रूंद रस्त्याने बाधित मिळकत क्षेत्र ६५६.५० चौ.मी. संपादन करण्यास आणि भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम १७ अन्वये म्हणजेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व १२९ तातडीने भूसंपादन करण्यास भूसंपादन खर्चासह सर्वानुमते मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१९/७ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) नुसार मौजे इटखेडा येथील गट क्र.८०,८३,६२/३ व ६३ मधील विकास योजना आरक्षण क्र.एच.डी/ऐ विस्थापित्याचे पुनर्वसन,६० मीटर रूंद रस्ता बीड बायपास वळण ते पैठण रोड ६० मी रूंद रस्ता पैठण ते औरंगाबाद तसेच आरक्षण क्र. डी/जे ''तपासणी बंगला '' (इन्सपेक्शन बंगलो) या प्रस्तावाने बाधित क्षेत्रासाठी मिळकत धारक मेसर्स नाथ सिड्स लिमिटेड, मेसर्स आकाश इन्टरप्राईजेस, मेसर्स आशू एन्टरप्राईजेस तर्फे ॲड.विजय गंगातीरे यांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये सर्व मालकी हक्काच्या कागदपत्रासह दिनांक १६.४.२००४ रोजी महानगरपालिकेस खरेदी सुचना दिलेली आहे. उक्त खरेदी सुचना नुसार भूसंपादन प्रस्ताव कालमर्यादित म्हणजेच दिनांक १५.१०.२००४ पूर्वी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे. नसता आरक्षण व्यापगत होईल.

तथापी ६० मी.रूंद रस्ता बीड बायपास या रस्त्याचा विकास सार्वजनिक बांधकाम खाते यांचेकडून झालेला आहे. तसेच ६० मी. रूंद रस्ता बीड बायपास वळण ते पैठण रोड या रस्त्याचे भूसंपादन कार्यवाही विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडे सुरू आहे. तसेच आरक्षण क्र.डी/जे ''तपासणी बंगला '' यासाठी सार्वजनिक बांधकाम खाते औरंगाबाद हे भूसंपादन संस्था असल्याने उक्त आरक्षण संपादन करणेसाठी जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/१३९६/२००४ दिनांक २९.५.२००४ नुसार मा.कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम खाते यांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे वरील प्रस्ताव सोडून आरक्षण क्र.एच.डी/ऐ ''विस्थापितांचे पुर्नवसन '' व ६० मीटर रूंद रस्ता पैठण ते औरंगाबाद या रस्त्यासह मिळकती गट क्र. ८०,८१,८२,८३ व ६३ एकूण बाधित क्षेत्र ४.५ हेक्टर (४५२०२ चौ.मी.) जमिन संपादन करणेसाठी त्यासाठी लागणारा भूसंपादन खर्च अंदाजे ५ कोटी अपेक्षित खर्चासह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.किशनचंद तनवाणी :सदरील विषय शहर सुधार समिती मार्फ़त सादर करण्यात यावा.

मा.महापौर : सदरील विषय हा शहर सुधार समितीकडे पाठविण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव शहर सुधार समिती मार्फत सादर करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र. ४२०/८ :**

सहाय्यक संचालक ,नगर रचना महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे हर्सूल येथील सर्व्हे क्र.२१७ एकूण क्षेत्र २० एकर १६ गुंठे असून सदर जमिन सरकारी असल्याने महानगरपालिकेस दिनांक २०.७.८४ रोजी हस्तांतर झालेले आहे.

उक्त २० एकर १६ गुंठे जमिन महानगरपालिकेस हस्तांतर होणेपूर्वी मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांनी उक्त जमिनीपैकी सहा (६) एकर जमिन जनरल माणिक शहा माजी सैनिक मागासवर्गीय गृह निर्माण संस्थेस जा.क्र.७४/एलएनडी/१७०-बी दिनांक २९.१.७६ नुसार देण्यात आलेली आहे.

तथापी उक्त सहा (६) एकर जमिन जनरल माणिक शहा माजी सैनिक मागासवर्गीय गृह निर्माण संस्थेने ७/१२ मध्ये नोंद न केल्यामुळे संपूर्ण क्षेत्र म्हणजे २० एकर १६ गुंठे महानगरपालिकस हस्तांतर झालेले आहे.

उपरोक्त संस्थेचे अध्यक्ष श्री.एस.के.राऊत यांनी सैनिक कल्याण अधिकारी, औरंगाबाद यांचे मार्फ़त निवेदन सादर करून मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांनी प्रदान केलेली सहा (६) एकर जमिन ७/१२ वर नोंद घेणे व ताबा देणे बाबत तहसिलदार औरंगाबाद यांना विनंती अर्ज केले असता त्यांनी महानगरपालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र मागणी केली आहे. त्यानुसार संस्थेने महानगरपालिकेला अर्ज सादर केलेले आहे.

सदरील जमिन महानगरपालिकेस हस्तांतर झालेली असून काही क्षेत्रावर खालील प्रमाणे विकास झालेला आहे. विकास निहाय क्षेत्र अंदाजे खालील प्रमाणे आहेत.

१) मंदिर - ४००४ चौ.मी.

२) स्मशानभूमी - ३०६९ चौ.मी.

३) शाळा (म.न.पा.) - ३४६७ चौ.मी.

४) तलावाचे क्षेत्रफ़ळ - १५७६३ चौ.मी.

५) म.न.पा.घरकुल - १९३३४ चौ.मी.

६) गाडी रस्ता - ७४३१ चौ.मी.

तसेच मंजूर विकास योजना आरक्षण व रस्त्याचे क्षेत्र खालील प्रमाणे आहेत.

१) १५ मी.विकास योजना रस्ता - २२५० चौ.मी.

२) प्रा.शा.व खेळाचे मैदान - ७२८० चौ.मी.

वरील प्रमाणे विकास झालेले व मंजूर विकास योजना प्रस्तावाचे अंदाजे क्षेत्र असून उर्वरीत क्षेत्र खुले असून मोजणीनुसार २ हेक्टर २० आर.आहे ते विकास योजनेनुसार रहिवासी वापरात आहे. उक्त जमिन महानगरपालिकेस हस्तांतर झालेले असल्याने उक्त संस्थेस जागा देता येणार नाही असे कळविले आहे. त्यामुळे संस्थेने मा.उच्च न्यायालयात याचिका क्रमांक १३८/२००१ दाखल केले असून मा.उच्च न्यायालयाने कायदेशीर तरतूदीनुसार शासनाने विचार करणे बाबत आदेश दिले आहेत. महानगरपालिका शासन नसल्याने महानगरपालिकेस कोणतेही निर्देश नाहीत.

त्यामुळे अर्जदाराने ॲड.भालचंद्र एम.पाटील यांचे मार्फ़त लिगल नोटीस दिली असून शासनाकडून म्हणजे मा.जिल्हाधिकारी मार्फ़त संस्थेस जागा दिली आहे. परंतू संस्थेने ७/१२ वर नोंद न घेतल्यामुळे संपूर्ण क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतर झालेले आहे. मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी

महानगरपालिकेत ना हरकत प्रमाणपत्र मागणी केलेली आहे. तरी मा.जिल्हाधिकारी यांनी सन १९७६ मध्ये प्रदान केलेले (६) सहा एकर जमिन संस्थेस परत द्यावे अशी विनंती केली आहे.

तहसिलदार यांनी प्रकरणात तलाठी यांचेकडून जागे बाबत पंचनामा रिपोर्ट मागणी केली असून तलाठी यांनी सदर जागा मोकळी असून अतिक्रमण झालेली नाही असा पंचनामा करून तहसिलदार औरंगाबाद यांना सादर केला आहे.

तथापी उपरोक्त जागेचा झालेला विकास तसेच मंजूर विकास योजनेनुसार असलेले आरक्षण/रस्ते इत्यादी बाबत तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचे मार्फ़त मोजणी करून घेतलेले आहे. त्याप्रमाणे अस्तित्वात झालेला विकास तसेच विकास योजना आरक्षणे व रस्ते सोडून २ हेक्टर २० आर.जमिन शिल्लक असल्याचे मोजणी नकाशा प्राप्त झालेला असून सदर जमिन विकास योजनेनुसार रहिवासी वापर दर्शविलेला आहे. सदर जमिन मिळणेसाठी उक्त संस्थेचे अध्यक्ष यांनी मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी प्रदान केली असल्याने संस्थेस परत देणेसाठी तगादा लावला आहे.

सबब प्रकरण योग्य त्या निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.भागवत कराड : हा विषय स्थगित करावा.

श्री.मीर हिदायत अली : विषय क्र.८ स्थगित करण्यात यावा.

मा.महापौर : विषय क्र.८ तुर्त स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र. ४२१/९ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने श्रीमती चंद्रकलाबाई नवगिरे, श्रीमती खंडाळे व इतर यांनी दिनांक १३.१०.९८ ला पत्र देवून मोहल्ला भीमनगर (भावसिंगपूरा) येथे सर्व्हे क्रमांक ४७/१ ही जमिन संपादन करून तेथे दवाखाना व आरोग्य केंद्र विकसीत करावा म्हणून विनंती केली आहे. त्यानुसार प्रकरणात एम.एच.ओ. यांचा अभिप्राय घेवून मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक ३५८/८ दिनांक २०.०३.१९९९ नुसार मंजूर करून भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/१३२९ दिनांक ०१.०६.१९९९ ला पाठविण्यात आला.

दरम्यान यशोधरा विकास समिती भिमनगर यांचेतर्फे श्री.एन.आर.खंडाळे यांनी उक्त जमिन सर्व्हे क्रमांक ४७/१ ही ३० वर्षापासून माझ्या ताब्यात व वहीवाटीत आहे. सदर जमिन विश्वशांती हौ.सो.व लक्ष्मण पडघन हे बोगस कागदपत्रे आधारे विक्री करत आहे. सदर जागेचा मी मालक व ताबेदार असल्याने तेथे दवाखाना व उद्यान विकसीत करावा सदर जागेच्या मालकी बाबत दिवाणी दावा क्रमांक सी.ए.न.२४५/९८ मध्ये मा.कोर्टाने ताबा ग्राह्य धरलेला आहे असे पत्रात नमुद केले आहे.

सदर जमिन वादग्रस्त असल्याने सर्व संबंधितास बोलावून कागदपत्राची तपासणी केली असता स.न.४७/१ ही जमिन ७/१२ नुसार विश्वशांती गृह निर्माण संस्थेची नोंद आहे. सदर जागेचे उक्त भूसंपादना बाबत तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे संयुक्त मोजणीसाठी मोजणी शुल्क रू.१०००/- दिनांक २४.११.१९९९ ला भरणा केले आहे.

दरम्यान दिनांक ११.०१.२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील अशासकीय ठराव क्रमांक १६४/१७ ची झेरॉक्स प्रत जोडून श्री.लक्ष्मण पडघन यांनी उपरोक्त जमिन संपादनातुन रद्द करावी. अशी विनंती केली, त्यानुसार प्रकरणांत विधी सल्लागार व तांत्रिक कक्ष यांचा अभिप्राय घेण्यात आला असता उपरोक्त भिमनगर या वस्तीलगत सुधारीत मंजूर विकास योजनेत आरक्षण क्रमांक १४१ वाचनालय व दवाखाना आणि १४२ उद्यान दर्शविण्यात आला, ती आरक्षणे सोडून सर्व्हे क्रमांक ४७/१ ही निवासी वापरातील जमिन संपादन करणे योग्य नाही. असे अभिप्राय दिला.

त्यानुसार सदर प्रकरणातील सर्व्हे क्रमांक ४७/१ मधील जमिन ही मालकी हक्का बाबत वादग्रस्त आहे. तसेच विधी सल्लागार व तांत्रिक कक्ष यांचा अभिप्राय आणि सर्वसाधारण सभेने सदर जमिन संपादनातुन वगळणेसाठी घेतलेला ठरावानुसार मा.आयुक्तांनी सदर नॉन डी.पी. प्रस्ताव भूसंपादनातुन रद्द करणे बाबत विशेष भूसंपादन अधिकारी, विशेष घटक औरंगाबाद यांना जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/२०४९/२००१ दिनांक २९.१०.२००१ नुसार कळविण्यांत आले आहे.

तथापी श्री.एन.आर.खंडाळे व इतर यांनी सदर सर्व्हे क्र.४७/ ही जमिन संपादन करून ''आरोग्य केंद्र '' व ''उद्यान'' विकसीत करावा म्हणून तगादा लावत आहे.

तर श्री.लक्ष्मण पडघन व इतर यांनी निवेदन सादर केले आहे की, सर्व्हे क्र.४७/१ ही जमिन विकास योजनेनुसार निवासी वापरात आहे. त्यामुळे आम्ही त्यात प्लॉट घेतलेले आहेत. त्यामुळे विकास योजनेतील आरक्षणाची जमिन संपादन न करता आमच्या निवास वापरातील प्लॉट का संपादन करता अशी तक्रार/विनंती केलेली आहे.

सबब सर्व्हे क्रमांक ४७/१ ही जमिन विकास योजनेनुसार रहिवासी वापरात असून अनाधिकृत भूखंड पाडून विक्री झालेली आहेत.

करीता उक्त जमिन उक्त आरक्षणासाठी संपादन करावे किंवा विकास योजना आरक्षणाखालील जमिन संपादन करावे ह्या बाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विकास योजना भाग नकाशासह विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.तकी हसन खॉन : पहिली बाब अशी की हा प्रस्ताव आलाच कसा ? या प्रस्तावात ४७/१ ही जमिन संपादन करून तेथे दवाखाना व आरोग्य केंद्र विकसीत करावा म्हणून दिले. आरक्षण क्रमांक १४१ नुसार ऑलरेडी रिझर्वेशन आहेत. यात भूसंपादन करावे म्हणून नमुद केलेले आहे. प्रस्ताव सभागृहासमोर आणतांना नियमाने कार्यवाही केलेली दिसून येत नाही. हा प्रस्ताव शासनाकडे पाठवावयास पाहिजे. यात विधी सल्लागार व तांत्रिक विभागाचे म्हणणे ही जागा संपादन करणे योग्य नाही असे नमुद केलेले आहे. त्यानंतरही आलेला आहे. यामागचा काय उद्देश आहे. या सभागृहास काय समजण्यात येते. या सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. असे माझे मत आहे व यापूर्वी एवढी मोठी चूक झाली नसेल व असे चुकीचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर आलेला नसेल. यात काय १४१ आरक्षण आपण डिलीट करणार आहात काय समजावयास मार्ग नाही. रद्द करावयाचे असेल तर का सभागृहापुढे आलेला आहे.

मा.महापौर : याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.कदीर मौलाना : एकतर हा प्रस्ताव कशासाठी आणलेला आहे. तसेच कोणाच्या सांगण्यानुसार आलेला आहे. याची चौकशी झाली पाहिजे. या जागेच्या संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मालकी हक्का बाबत वाद चालु आहे. जागा कुणाची आहे निश्चित माहिती नाही. ती जागा महानगरपालिकेस कशा पध्दतीने देणार आहे. या बाबतीत संपूर्ण चौकशी होणे आवश्यक आहे.

सौ.नईम सुलताना : विकास खर्च भरलेला आहे का ?

श्री.सुरजितसिंग खुंगर : प्रस्तावातील परिच्छेद क्र.४ मध्ये दिनांक ११.१.२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील अशासकीय ठराव क्रमांक १६४/१७ ची झेरॉक्स प्रत जोडून श्री.लक्ष्मण पडघन यांनी उपरोक्त जमिन संपादनातून रद्द करावी अशी विनंती केली. त्यानुसार प्रकरणांत विधी सल्लागार व तांत्रिक कक्ष यांचा अभिप्राय घेण्यात आला असता उपरोक्त भिमनगर या वस्तीलगत सुधारीत मंजूर विकास योजनेत आरक्षण क्रमांक १४१ वाचनालय व दवाखाना

आणि १४२ उद्यान दर्शविण्यात आला ती आरक्षणे सोडून सर्वे क्रमांक ४७/१ ही निवासी वापरातील जमिन संपादन करणे योग्य नाही असे अभिप्राय दिला. असे असतांना सुध्दा असा प्रस्ताव सभागृहा समोर येण्याची गरज काय होती. सविस्तर खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री.संजय सिरसाट : प्रशासकीय ठराव आलेला आहे. पहिल्यांदाच आरक्षण सोडून निवासी वापरातील जमीन संपादन करण्याचा ठराव येत आहे. चुकीने मांडला असेल स.सदस्य चर्चा करतील. हे सभागृह सक्षम आहे. त्यानुसार मा.महापौर आदेशीत करतील त्यानुसार त्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही होईल यात शंका नाही. यापूर्वीही प्रशासकीय ठराव या सभागृहात या जागेच्या बाबतीत आलेला होता. सर्वे नंबर दिलेला होता. दवाखाना व उद्यानसाठी जागा रिझर्व ठेवण्यात आलेली होती. त्या व्यक्तीने विषयामध्ये ही जागा नको आहे ही जागा पाहिजे आहे म्हणून अर्ज केलेला होता. मुळात डी.पी.प्लॅननुसार रिझर्वेशन आलेले आहे. जी रिझर्वेशनी जागा आहे त्या ठिकाणी दवाखाना सुध्दा आहे. जागा विकसीत केली परंतु कोणत्यातरी पक्षाच्या व्यक्तीने मागणी करावयाची व महानगरपालिकेकडे अर्ज द्यायचा. अशा प्रकारचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर आल्यानंतर त्याचे प्रयोजन काय यानंतरही अशासकीय ठराव येऊन जी जागा रिझर्वेशनची आहे ती योग्य आहे मंजूर आहे तोही ठराव रद्द केलेला आहे. हा प्रस्ताव कोणाच्या सांगण्यावरून मांडण्यात आलेला आहे. स.नगरसेवकांच्या संमतीने प्रस्ताव आला असता तर कदाचित मान्य केला असता परंतु बाहेरील एखाद्या पक्षाचा व्यक्ती उद्या महानगरपालिकेची/ इमारतीची जागा संपादन करावी म्हणून पत्र देईल त्यानुसार कार्यवाही करणार काय. चुकीच्या पध्दतीने प्रस्ताव मांडला त्याची चौकशी तर आवश्यक असून त्या संबंधीत अधिकाऱ्यांवर कार्यवाही सुध्दा अपेक्षित आहे.

श्री.सुरजितसिंग खुंगर : प्रस्तावात स्पष्ट देण्यात आलेले आहे की, एन.आर.खंडाळे व इतर यांनी वारंवार तगादा लावलेला आहे त्यामुळे प्रस्ताव सादर केलेला आहे.

श्री.भगवान घडमोडे : प्रस्तावानुसार निश्चित काय निर्णय अपेक्षीत आहे याचा बोध होत नाही. महानगरपालिकेच्या संबंधीत विभागाने कौशल्य दाखविले अमूक व्यक्तिने पत्र दिले अमुक व्यक्तीची अशी मागणी आहे. संबंधीत विभागाची भूमिका यामागे काय आहे  कळायला मार्ग नाही. प्रस्ताव ठेवतांना कसा ठेवावा व ठेवण्यात आलेला प्रस्ताव योग्य आहे की, नाही याची सुध्दा जाणीव प्रशासनाने ठेवावयास पाहिजे. एखादा सामान्य नागरीक उद्या म्हणेन महापालिकेची अमुक इमारत द्यावी म्हणून कुणाच्या सांगण्यावरून मागणीवरून प्रस्ताव सभागृहासमोर आणणे ही अत्यंत चुकीची पध्दत आहे. संपूर्ण माहिती प्रस्तावात देणे आवश्यक होते. विभाग प्रमुख म्हणून संबंधीत अधिकारी यांनी त्याचे मत व्यक्त करावे. नंतर या प्रस्तावावर चर्चा करण्यात यावी.

श्री.राजेंद्रसिंग जबिंदा : प्रस्ताव नियमानुसार सभागृहासमोर आलेला आहे का ? वैयक्तिक व्यक्तीने पत्र द्यायचे सभागृहासमोर प्रस्ताव आणणे योग्य नाही. चौकशी झाली पाहिजे.

श्री.जयवंत ओक : सन १९९९ प्रस्ताव झाला पुन्हा २००१ मध्ये सभागृहात तो ठराव रद्द करण्यात आला. पुन्हा तोच ठराव सभागृहासमोर येतो. हा प्रस्ताव कोणी आणला कोणाच्या सांगण्यावरून आला त्याची चौकशी होऊन कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्या भागात आरोग्य केंद्र आहे उद्यान आहे. त्याबाबतचे छायाचित्र सुध्दा आहे. तेथे महानगरपालिकेची शाळा आहे. म्हणून हा प्रस्ताव

रद्द करावा चौकशी समिती नियुक्त करावी. त्यात विरोधी पक्ष नेता मा.सभापती तसेच इतर चार स.सदस्यांचा समावेश करावा.

श्री.मीर हिदायत अली : सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. चुकीचा प्रस्ताव मांडला. रद्द करावा. याबाबत चौकशी करण्यात यावी.

श्री.कदीर मौलाना : या जागेचे मालक कोण आहे खुलासा करावा.

सहा.संचालक न.र. : प्रस्तावात कारण नमुद करण्यात आलेले आहे. माझे स्वत:चे मत व्यक्त करतो की, भिमनगर (भावसिंगपुरा) या वस्तीत मंजूर विकास योजनेत आरक्षण क्रमांक १४१ वाचनालय व दवाखाना आणि १४२ हे उद्यान म्हणून दर्शविण्यात आले आहे. ती आरक्षणे सोडून सर्वे क्रमांक ४७/१ ही निवासी वापरातील जमिन संपादन करणे योग्य नाही.

श्री.कदीर मौलाना : ऐनवेळी प्रस्ताव आणायचे सर्व मंजूर मंजूर म्हणून निर्णय घ्यावयाचा हे सभागृहाच्या विरूध्द होत आहे. गंभीर स्वरूपाची बाब आहे. त्याच धर्तीवर हा विषय आणलेला आहे. सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. याची चौकशी झाली पाहिजे. या प्रस्तावास आमचा विरोध आहे. या जागेचे मुळ मालक कोण आहे समजायला मार्ग नाही.

श्री.किशनचंद तनवाणी : या बाबत प्रशासकीय समिती नियुक्त करावी. अध्यक्ष मा.आयुक्त राहतील. हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

मा.महापौर : विषय क्र.९ हा रद्द करण्यात येत आहे.

श्री.भागवत कराड : मा.आयुक्त यांनी चौकशी करावी सर्वसाधारण सभेत अहवाल सादर करावा.

श्री.कदीर मौलाना : या सभागृहात प्रस्ताव चुकीचा आणला कसा. सर्व पत्रकार बंधु बसलेले आहे. जनतेच्या समोर प्रसिध्दी माध्यमातून माहिती होणार आहे. सभागृहाची दिशाभूल केली. प्रस्ताव मंजूर झाला असता तर मुळ मालकच कोण आहे माहिती नाही पैसे कोणास देणार होते. खुलासा होणे आवश्यक आहे.

श्रीमती शाहीन जफ़र : प्रस्ताव आला कसा सविस्तर खुलासा होणे आवश्यक आहे. आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.कदीर मौलाना : अशाच प्रकारे घाई गडबडीने प्रस्ताव आणले जातात. ते सर्वच मंजूर केले जातात यात महानगरपालिकेचे नुकसान होते. यापूर्वी असे किती प्रस्ताव सभागृहासमोर आणून मंजूर झालेले आहेत.

श्री.प्रकाश निकाळजे : काही स.सदस्यांचा या संबंधी गैरसमज झालेला आहे. प्रस्तावात स्पष्ट दिले आहे की, काही राजकीय पक्षाच्या लोकांनी प्रशासनाकडे मागणी केलेली आहे. विरूध्द बाजूच्या लोकांनी येऊन मा.महापौरांना विनंती केलेली आहे की, ही जागा भूसंपादन करण्यात येऊ नये. काही राजकीय पक्षाच्या लोकांनी प्रशासनाकडे मागणी केल्यानुसार प्रशासनाने सभागृहासमोर प्रस्ताव आणलेला आहे. तो मंजूर करायचा की नाही हा सभागृहाचा अधिकार आहे.

श्री.कदीर मौलाना : कुण्या पक्षाच्या लोकांनी मागणी केल्यानंतर प्रशासनाला असा प्रस्ताव मंजुरीसाठी आणता येतो का ? प्रस्ताव का मंजुरीसाठी आणलेला आहे. हा प्रश्न आहे.

मा.आयुक्त : सदर प्रस्ताव नगररचना विभागाकडून सादर झालेला आहे. त्याची पार्श्वभूमी अशी आहे की, वारंवार मागणी केल्यानंतर वस्तुस्थिती व भूसंपादनाचा विषय हा सर्वसाधारण सभेचा विषय आहे म्हणून प्रस्ताव समोर आलेला आहे. प्रशासन स्वत: याबाबतीत काही निर्णय घेऊ शकत नाही . जे आरक्षण आहे ते प्रशासकीय ठराव घेऊनच कायम केलेले आहे. दवाखाना व उद्यानसाठी तेथे

आरक्षण आहे. ती विकसीत न होता ४७(१) श/ मध्ये व्हावी प्रशासनाकडे मागणी केली तेव्हा नगररचना व विधी विभागा मार्फ़त तपासणी केली. विधी व नगररचना विभागाचे असे मत आहे की जरी लोकसंख्या विचार करून ती जागा दवाखाना व उद्यानसाठी विचारात घ्यावयाची किंवा कसे या बाबत पाहणी केली व ठरावात स्पष्ट मत लिहिलेले आहे की, जागा ४७ (१) ही निवासी वापरातील जागा संपादन न करता विकास योजना आरक्षणातील जी दवाखाना व उद्यानसाठी जागा ठेवण्यात आलेली आहे. ती संपादन करावी. करणे योग्य होईल. विकास योजना प्रस्तावा प्रमाणे संपादीत करावयाची किंवा कसे याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. सन ४७ (१) ची जमिन खाजगी आहे. ती घ्यावयाची झाल्यास भूसंपादन करावी लागेल. खर्चाची बाब आहे. त्यासाठी सभागृहाची मंजूरी लागते. प्रशासनाने प्रशासनाचे मत स्पष्ट केलेले आहे. यासाठी जी आरक्षित जागा आहे तीच विकसीत करावे असे मत आहे. संघटनेची मागणी आहे, आरक्षणातील जागेवर विकास न करता खाजगी जमिन सर्व्हे क्र.४७(१) घेऊन विकसीत करावी. प्रशासनो स्पष्ट मत दिले आहे की, सर्वे क्रमांक ४७ (१) खाली जी जागा आहे ती न घेता दवाखाना व उद्यानसाठी ठेवण्यात आलेले आरक्षण विकसीत करावे म्हणून प्रशासनाचे मत आहे. सर्व्हे क्र.४७(१) खालील जमिन द्यावी म्हणून प्रशासनाने कोठेही मागणी केलेली नव्हती. पुढच्या वेळी सविस्तर अशी माहिती दिली जाईल.

श्री.संजय शिरसाठ : आताच मा.आयुक्तांनी जो खुलासा केला तो स्पष्ट केलेला आहे. मुळ आरक्षणातीलच जागा विकसीत करायची आहे. प्रस्तावातच स्पष्ट दिलेले आहे. कोणतीही कार्यवाही करीत असतांना किंवा एखाद्या नागरीकाने प०स्ताव दिला असेल तर बांधकाम करता येत नाही. ले आऊट मंजूर करता येत नाही किंवा ही जागा विकसीत करता येत नाही. अनधिकृत वस्ती आहे म्हणून परवानगी देता येत नाही अशी परस्पर उत्तरे दिली जातात. संबंधीत व्यक्ती हा एका पक्षाचा नेता आहे. तो न्यायालयात गेलेला होता. न्यायालयात त्यांचे विरूध्द निकाल लागलेला आहे. तो त्याची मालकी त्या जागेला लावण्याचा प्रयत्न करीत होता. ती जागा ताब्यात येत नाही मला नाही तर दुसऱ्याला नको म्हणून महापालिकेशी त्यांनी पत्रव्यवहार केला. डी.पी.प्लॅननूसार उद्यान व दवाखान्यासाठी जागा आरक्षणात आहे मंजूर झालेली आहे. असे पत्र देऊन कळविता येत होते. प्रस्ताव सभागृहासमोर आणण्याची आवश्यकताच नव्हती. हा प्रस्ताव या सभेत आणून मोठा आर्थिक व्यवहार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सभागृहासमोर प्रस्ताव येण्याची आवश्यकता नव्हती तो का आलेला आहे. याचा खुलासा स.सदस्यांना अपेक्षित आहे.

मा.आयुक्त : स.सदस्य श्री.सिरसाट यांनी उपस्थित केलेला प्रश्न बरोबर आहे. २००३ मध्ये त्यावेळच्या नगररचना अधिकारी यांनी तसे पत्र देऊन उत्तर दिलेले आहे. घटनाक्रम कसा आहे ते थोडक्यात सांगितले.

श्री.संजय सिरसाट : अशा प्रकारे अनेक पक्षाचे लोक महानगरपालिकेकडे येतील अमुक काम करावे नसता उपोषण करू आंदोलन करू धरणे धरू असे म्हणतील तर त्यानुसार अशा प्रकारे प्रस्ताव सादर करणार का ?

मा.आयुक्त : स्पष्ट उत्तर असे आहे की, खाजगी जमीन भूसंपादन करणे यास प्रशासन प्रशासकीय मान्यता देऊ शकत नाही.

श्री.कदीर मौलाना : कायद्यानुसार तो प्रस्ताव कसा आलेला आहे. या बाबत खुलासा केलेला आहे यासी आम्ही सहमत आहोत. परंतु चुकीने प्रस्ताव आणलेला आहे. यापूर्वी बरेचसे ऐनवेळचे प्रस्ताव मंजूर मंजूर म्हणून कार्यवाही झालेली आहे. हाही प्रस्ताव मंजूर होईल अशी अपेक्षा ठेऊन आणलेला आहे. मंजूर मंजूर म्हणायचे ही भूमिका समोर ठेवून प्रस्ताव मंजूर करायचे व राष्ट्रगिताने सभा संपवायची ही पध्दत बरोबर नाही.

श्री.संजय सिरसाट : ऐनवेळी प्रस्ताव येतात ते घ्यायचे की नाही, महापौरांचा अधिकार आहे. या प्रस्तावा संबंधी सर्वांचे एकमत आहे की, प्रस्ताव सभागृहासमोर मांडला कसा त्याचा खुलासा करावा म्हणून . जर आणखी कुणी उप प्रश्न करून या सभागृहात नुसती चर्चाच तर होते अशी भावना अधिकाऱ्यांची होऊ नये सर्वांचेच मत आहे प्रस्ताव का सादर करण्यात आला.

श्री.प्रकाश निकाळजे : प्रशासनाने प्रस्ताव आणलेला आहे. मंजूर करायचा किंवा नाही हा सभागृहाचा अधिकार आहे. ते सभागृहाने फ़ेटाळला आहे.

**संवाद :**

मा.महापौर : विषय क्र.९ हा रद्द करण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव रद्द करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

## पुरवणी विषय

**विषय क्र. ४२२/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेने सुरू केलेल्या जैविक घन कचरा प्रकल्पाचा दर हा आकारण्यात येणाऱ्या दरापेक्षा जास्त व न परवडणारा असल्यामुळे अद्यापही प्रकल्प सुरळितपणे चालु नाही.

नाशिक शहरातही दर रू.२.५० प्रतिदिन प्रतिखाट असा आकारला जात आहे,

१. औरंगाबाद महानगरपालिकेने सर्वसाधारण सभेत दर रू.२.५० प्रतिदिन प्रतिखाट ठेवावा व रॉयल्टी रद्द करावी.

२. दर कमी केल्यानंतर सल्लागार समितीच्या प्रस्तावाशिवाय त्यामध्ये वाढ करण्यात येऊ नये.

सुचक : श्री.जयवंत ओक अनुमोदक : श्री.रणधिर होलीये

**संवाद :**

श्री.किशनचंद तनवाणी : इंडियन मेडीकल असोसिएशनने महानगरपालिकेस निवेदन दिलेले आहे की, इतर महानगरपालिके मध्ये दर रू. २.५० प्रतिदिन प्रतिखाट असे आहे. इथेही त्यांचेकडून तेथील दर घ्यावेत.

श्री.भागवत कराड : जैविक घन कचरा प्रकल्प संदर्भात सभासद होण्यासाठी ५००/- घेण्याऐवजी २००/- घेण्यात यावे.

मा.महापौर : दुरूस्तीसह प्रस्ताव मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,व सभागृहात झालेल्या चर्चेनूसार प्रतिदिन प्रतिखाट दर रू.२.५० प्रमाणे ठेवणेस तसेच जैविक घन कचरा प्रकल्पा संदर्भात सभासद होणेसाठी रू.५००/- ऐवजी रू.२००/- घेण्यांस या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२३/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पिया मार्केट (भाजी मंडी) संकुलाच्या बाजुला शौचालय व मुत्रीगृह बांधणे बाबत. त्या ठिकाणी ६५ लाख रूपये खर्च करून दुकाने अद्यावत केलेली आहे. पण त्या ठिकाणी गेल्या दोन वर्षापासून शौचालय बांधण्यात यावे अशी मागणी तेथील नागरीकांकडून व व्यापाऱ्यांकडून होत आहे.

तरी तात्काळ शौचालय व मुत्रीगृह बांधण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

सुचक : श्री.जयवंत ओक अनुमोदक : श्री.रणधीरसिंह होलीये

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,पिया मार्केट (भाजी मंडी) संकुलाच्या बाजुला शौचालय व मुत्रीगृह बांधणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२४/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,वार्ड क्र.४२ येथील ड्रेनेजच्या भांडवली कामासाठी अर्थसंकल्प २००४-२००५ मध्ये पान क्र.१७१ वर अ.क्र.६३ सदरील कामासाठी रक्कम रूपये दोन लाखाची आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे परंतु मोहल्ला एस.टी.कॉलनी येथे संरक्षण भिंत बांधणे फार जरूरीचे असल्याने सदरील दोन लाखाची रक्कम संरक्षण भिंतीच्या कामासाठी वर्ग करण्यात यावी.

करिता प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.मोहम्मद जावेद कुरैशी अनुमोदक : श्री.मिर हिदायत अली, श्री.नजर हमीद

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४२ येथील ड्रेनेजच्या भांडवली कामासाठी अर्थसंकल्प २००४-२००५ मध्ये पान क्र.१७१ वर अ.क्र.६३ वर ठेवण्यांत आलेली रक्कम रूपये दोन लाखाची आर्थिक तरतुद मोहल्ला एस.टी.कॉलनी येथे संरक्षण भिंत बांधणे करीता वर्ग करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२५/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.४२ येथील विविध ठिकाणी कॉक्रेटींग करण्यासाठी अर्थसंकल्पात पान क्र.१३६ व अ.क्र.३० वर दोन लाख रूपयेची आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे परंतु सध्या पावसाळ्याचे दिवस असुन वार्डात अनेक ठिकाणी पावसाळ्याचे पाणी वाहुन जाण्यासाठी नाल्या बनविणे फार आवश्यक आहे.

तरी कॉक्रेटींग कामासाठी असलेली रक्कम वार्डात विविध ठिकाणी नाल्या बनविण्यासाठी वर्ग करण्यांत यावे, करिता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.मोहम्मद जावेद कुरैशी अनुमोदक : श्री.मिर हिदायत अली,श्री.रावसाहेब औताडे

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.४२ येथील विविध ठिकाणी कॉक्रेटींग करण्यासाठी अर्थसंकल्पात पान क्र.१३६ व अ.क्र.३० वर ठेवण्यांत आलेली रू.२ लाखाची आर्थिक तरतुद या ऐवजी सदरील वार्डात विविध ठिकाणी नाल्या बनविण्यासाठी वर्ग करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२६/५ :**

मौजे हर्सुल येथील सर्व्हे क्रमांक २१६ (भाग) व २१७ (भाग) मधील औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक -०६, प्राथमिक शाळा व आरक्षण क्रमांक-०७ खेळाचे मैदान ही महानगरपालिकेच्या मालकीची असलेली जमीन शैक्षणिक कार्यासाठी कै.सुशीलादेवी बहुउद्देशीय, शैक्षणिक, सामाजिक सेवाभावी संस्था, औरंगाबाद यांनी मागणी केली आहे. ही संस्था नोंदणीकृत आहे. ह्या संस्थेस शाळा चालविण्यासाठी महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेली जमीन, महानगरपालिकेने ठरविलेल्या दराने कै.सुशीलादेवी बहुउद्देशीय,शैक्षणिक, सामाजिक सेवाभावी संस्था ह्या संस्थेस समुचित प्राधिकरण घोषित करून जागा प्रदान करण्याचा प्रस्ताव स्वीकृतीसह मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.नंदकुमार फुलारी अनुमोदक : श्री.सोपान पारे, श्री.मोहन मेघावाले

**संवाद :**

श्री.भागवत कराड : हा प्रस्ताव मंजूर करू नये महानगरपालिकेची जागा आहे. प्रस्ताव अशासकीय आहे. आमचा विरोध आहे. सविस्तर माहिती दिलेली नाही.

श्री.कदीर मौलाना : या प्रस्तावास आमचा विरोध आहे. प्रस्ताव मंजूर करण्यात येऊ नये.

श्री.प्रकाश निकाळजे : महानगरपालिका मनपाच्या ज्या शाळा आहेत त्या भाडेच्या इमारतीमध्ये चालविते व शाळेसाठी असलेले आरक्षण संस्थेस देणे बरोबर नाही. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येऊ नये. यामुळे विरोध आहे.

श्री.भागवत कराड : संस्थेला महानगरपालिकेची आरक्षणातील सर्व्हे क्रमांक २१६ २१७ भागश: मधील जागा द्यावी म्हणून प्रस्ताव सादर झालेला आहे. परंतु जमिन किती आहे, संस्था काय काम करते नमुद नाही म्हणून महानगरपालिकेची कोणतीही जागा कोणत्याही संस्थेला देण्यात येऊ नये पूर्ण भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांचा विरोध आहे.

श्री.नंदकुमार फुलारी
श्री.नंदकुमार घोडेले : मंजूर करावे.

श्री.संजय सिरसाट : यापूर्वी ज्या ज्या जागा संस्थेला दिलेल्या आहेत त्या परत घेण्यात याव्यात.

श्री.भगवान घडमोडे : यापूर्वी महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासून ज्या ज्या संस्थेला जमिन दिलेली आहे, ज्या कारणासाठी दिल्या त्याचा वापर होतो काय त्याची चौकशी झाली पाहिजे. त्या संस्था कार्यरत आहेतका त्याची अंमलबजावणी होते का? जनतेने आपणांस त्यांची विकास कामे करण्यासाठी पाठविलेले आहे. जागा वाटप करण्यासाठी नव्हे. हे विचारात घेतले पाहिजे. हा प्रस्ताव रद्द करावा.

श्री.किशनचंद तनवाणी : किती जागा द्यायची आहे प्रस्तावात स्पष्ट उल्लेख नाही त्यासाठी पुढील बैठकीत सविस्तर माहिती घेवून प्रस्ताव ठेवण्यात यावा.

मा.महापौर : सदरील प्रस्ताव पुढील बैठकीत सविस्तर माहितीसह ठेवावे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव सविस्तर माहितीसह पूढील बैठकीत ठेवणेस सर्वानूमते मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र. ४२७/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सर्वसाधारण सभा ठराव क्र.४०९/१५ दिनांक २०.७.२००४ अन्वये दिनांक १९.६.२००४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.३३२/५ जकात दर अनुसूची 'ओ' मध्ये गॅस,पेट्रोल,डिझेल व गृहपयोगी वस्तु सोडून त्या प्रस्तावासोबत जोडलेल्या विवरणाप्रमाणे केलेली जकातवाढ रद्द करण्याचा प्रस्ताव सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.१ (र)

प्रमाणे सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास मंजुरी मिळालेली आहे. त्या अनुषंगाने सर्वसाधारण सभा दि.१९.०६.२००४ मध्ये विषय क्र.३३२/५ रद्द करणेबाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.किशनचंद तनवाणी अनुमोदक : श्री.नंदकुमार घोडेले,श्री.नंदकुमार फुलारी

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वसाधारण सभा ठराव क्र.४०९/१५ दिनांक २०.७.२००४ अन्वये दिनांक १९.६.२००४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमधील विषय क्र.३३२/५ जकात दर अनुसूची 'ओ' मध्ये गॅस,पेट्रोल,डिझेल व गृहपयोगी वस्तु सोडून त्या प्रस्तावासोबत जोडलेल्या विवरणाप्रमाणे केलेली जकातवाढ रद्द करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२८/७ :**

एन-७ सिडको महानगरपालिका केंद्रिय प्राथमिक शाळेस कै.विश्वासराव साळुंके नाव देण्याबाबत या परिसरातील नागरीक सतत मागणी करत आहे.सदरील शाळेस कै.विश्वासराव साळुंके असे नांव देण्याबाबत सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजुरी द्यावी.

सुचक : श्री.नंदकुमार फुलारी अनुमोदक : श्री.मोहन मेघावाले, श्री.नंदकुमार घोडेले

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-७ सिडको महानगरपालिका केंद्रिय प्राथमिक शाळेस कै.विश्वासराव साळुंके नांव देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२९/८ :**

एन-६, सिडको येथील महापालिकेच्या शाळेच्या प्रांगणात बांधण्यात आलेल्या वाचनालयास शुरवीर महाराणा प्रताप यांचे नांव देण्यांत यावे.

करिता प्रस्ताव स्विकृतीसह मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.विमलताई राजपुत,श्री.किशनचंद तनवाणी, श्री.नंदकुमार घोडेले

अनुमोदक : श्री.नंदु फुलारी, श्री.रतनकुमार पंडागळे, श्री.भरत लकडे

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-६ सिडको येथील महापालिकेच्या शाळेच्या प्रांगणात बांधण्यात आलेल्या वाचनालयास शुरवीर महाराणा प्रताप यांचे नांव देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.भागवत कराड : ऐनवेळचे जे प्रस्ताव स.सदस्यांचे अर्थसंकल्पातील हेड चेंज करण्याचे असतील ते सर्व मंजूर करण्यात यावे.

श्री.किशनचंद तनवाणी : ऐनवेळचे प्रस्ताव मंजूर करावयाचे की नाही अगोदर निर्णय घ्यावा. प्रशासकीय विषय असतील तर ते सभागृहात वाचून दाखववे. पुन्हा आरोप करण्यात येऊ नये.

## ऐनवेळचे प्रस्ताव

**चर्चा :**

श्री.मीर हिदायत अली : प्रशासकीय जे प्रस्ताव आलेले आहे ते सर्व मंजूर करण्यात यावे.

मा.महापौर : ऐनवेळचे सर्व विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**विषय क्र. ४३०/१ :**

प्र.कार्यकारी अभियंता (ज.नि. व वि.), महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.५८ मधुन वाहणाऱ्या नाल्यामधील गाळ काढणे, मेन सिव्हर लाईनची अपरूटींग करणे, मेन सिव्हर ब्रँच लाईन अपरूटींग करणे, मेनहोल चेंबर नविन बांधणे, नाल्यातील गाळ नारेगांव ट्रेंचिंग ग्राऊंड येथे टाकण्याच्या कामाचे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण व सा.बां. खात्याच्या सन २००२-२००३ च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये २९,९६,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदरील काम अर्थसंकल्प २००४-२००५ लेखा शिर्षक ''नाला ट्रेनिंग'' मधुन प्रस्तावित करण्यात आले आहे. उक्त कामासाठी अर्थसंकल्प २००४-२००५ च्या पृष्ठ क्र.१७६ वर अ.क्र.२ व १२ प्रस्तावास एकूण आर्थिक तरतुद रू.३०.०० लक्ष उपलब्ध आहे.

सदरच्या कामाअंतर्गत कैलासनगर स्मशानभूमी पासून ते जाफरगेट आठवडी बाजार नाल्यापर्यंतच्या कामाचा समावेश आहे. सदरचे कामाच्या प्रस्तावात कैलासनगर स्मशानभूमी पासून मागे मोतीवाला नगर, एमजीएम पर्यत नाल्यामधील मेन सिव्हर लाईन दुरूस्त करण्यासाठी व जाफरगेट आठवडी बाजार पासून पुढे सिध्दार्थउद्यान खामनदी मधील मेन ट्रंक सिव्हर लाईन पर्यंत टप्पा क्रमांक २ म्हणून काम करण्यास पुढील आर्थिक वर्षात भरीव आर्थिक तरतूद ठेवण्याची आवश्यकता आहे. तशी तरतूद पुढील अर्थसंकल्पात करण्यास अधिन राहून उक्त कामास प्रशासकीय मान्यता देण्यास्तव मा. आयुक्तांनी शिफारस केलेली आहे.

करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये २९,९६,०००/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाफरगेट आठवडी बाजार पासून पुढे सिध्दार्थउद्यान खामनदी मधील मेन ट्रंक सिव्हर लाईन पर्यंत टप्पा क्रमांक २ म्हणून काम करण्यास पुढील आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात भरीव तरतुद करण्यास अधिन राहून प्रभाग क्र.५८ मधुन वाहणाऱ्या नाल्यामधील गाळ काढणे, मेन सिव्हर लाईनची अपरूटींग करणे, मेन सिव्हर ब्रँच लाईन अपरूटींग करणे, मेनहोल चेंबर नविन बांधणे, नाल्यातील गाळ नारेगांव ट्रेंचिंग ग्राऊंड येथे टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रूपये २९,९६,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वेधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३१/२ :**

उप आयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेचे सन २००४-२००५ चे अंदाजपत्रक रू.१७३.०० कोटीचे असुन प्रारंभीची शिल्लक रू.१२.०० कोटीसह एकुण रू.१८५.०० कोटीचा अर्थसंकल्प आहे. सदरील अंदाजपत्रकावर नियंत्रण ठेवणे व त्याची अंमलबजावणी करणे या करीता मुख्य लेखाधिकारी यांना सहाय्यक म्हणून सध्या वर्ग-२ संवर्गातील एकच लेखाधिकारी कार्यरत आहे. वास्तविकत: राज्यातील इतर महानगरपालिकांमध्ये औरंगाबाद महानगरपालिके सारख्या इतर समकक्ष महानगरपालिकामध्ये मुख्य लेखाधिकारी यांना सहाय्यक म्हणून वर्ग-२ संवर्गातील लेखाधिकारींची संख्या काही ठिकाणी २ तर काही ठिकाणी ३ अशी अस्तित्वात आहे. त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेतील मुख्य लेखाधिकारी व सध्या कार्यरत असलेले लेखाधिकारी

यांच्याकडील कामाचा बोजा विचारात घेता या महानगरपालिकेमध्ये मुख्य लेखाधिकारी यांना सहाय्यक म्हणून एक नविन लेखाधिकाऱ्याचे पद असण्याची गरज भासु लागली आहे. लेखा विभागातील कामकाज हा मुख्यत: जमा बाजु, खर्च बाजु व अंदाजपत्रकिय नियंत्रण या पध्दतीने चालतो यामुळे लेखाधिकारी ही पदे दोन असल्यास त्यांना जबाबदारीचे वाटप करून प्रभावीपणे लेखाविभागाची कामे करता येतील.

सद्य परिस्थितीत महानगरपालिकेच्या अस्थापनेवर लेखापाल हे पद वेतनश्रेणी रू.५५००-१७५-९००० या वेतनश्रेणीत असुन या पदास लेखाधिकारी पदात रूपांतरीत करून लेखाधिकारी पदाची जबाबदारी देता येईल. यामुळे लेखाविभागातील कामाचा मुख्य लेखाधिकारी व सध्या कार्यरत असलेले लेखाधिकारी यांच्याकडील कामांचा व्याप कमी होईल आणि कामे जलद गतीने होण्यास मदत होईल. लेखापाल यांच्याकडे लेखाधिकारी पदाचे जबाबदारी देतांना केवळ लेखापाल या पदाची श्रेणीवाढ केल्यास त्यांना पुढीलप्रमाणे वेतनश्रेणी रू.७४५०-२२५-११५०० देऊन लेखापाल हे पद लेखाधिकारी या पदात रूपातंरीत करता येऊ शकते.

महानगरपालिकेमध्ये नविन लेखाधिकारी हे पद निर्माण केल्यास त्यावर वार्षिक रू.१.७५ लक्षचा आर्थिक बोजा वाढेल व लेखापाल या पदाची श्रेणीवाढ करून सदरचे पद लेखाधिकारी पदात रूपांतरीत केल्यास महानगरपालिकेवर वार्षिक रू.२५ हजाराचाच बोजा पडेल. आर्थिक दृष्टीकोनातून महानगरपालिकेचे हित विचारात घेता लेखाधिकारी पदाची नविन निर्मिती न करता लेखापाल पदाचीच श्रेणीवाढ करून लेखाधिकारी पदात रू.७४५०-२२५-११५०० या वेतनश्रेणीमध्ये रूपांतरीत करण्यास मान्यता देणे योग्य राहील.

सन २००४-२००५ या आर्थिक वर्षामध्ये औरंगाबाद महानगरपालिकेचे एकुण अंदाजपत्रकीय उत्पन्न रू. १७३.०० कोटी अपेक्षित असुन यातून शासकीय व इतर अनुदाने रू.१४.०० कोटी वजा जाता रू.१५९.०० कोटीचे उत्पन्न अपेक्षित आहेत. या आर्थिक वर्षामध्ये अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतन व भत्त्यावर रक्कम रू.४३.९० कोटी खर्च अपेक्षित आहे. अपेक्षित अस्थापना खर्चाची टक्केवारी २७.६१ % असुन लेखापाल या पदाची श्रेणीवाढ केल्यास होणारा वार्षिक जास्तीचा खर्च रू.२५००० असुन अस्थापनाच्या टक्केवारीमध्ये वाढ होणार नाही.

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या अस्थापनेवरील लेखापाल या पदाची श्रेणीवाढ करून लेखापाल हे पद वेतनश्रेणी रू.७४५०-२२५-११५०० मध्ये लेखाधिकारी पदात रूपांतरीत करण्यासाठीचा प्रस्ताव स्विकृतीसह मंजूर करण्यांत येतो, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३२/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सौ.के.के.जिवणे, जिवशास्त्रज्ञ यांची नगर परिषद, परभणी येथून महानगरपालिका औरंगाबाद येथे मा.महासंचालक, आरोग्य सेवा मुंबई यांचे आदेश क्र.सारासे/गट-ब/जिहिअहअजीव/बदल्या कक्ष-४/४, दि.३१.५.२००४ च्या आदेशान्वये बदली झाल्याने व त्यांना सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (हिवताप) औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र जा.क्र.आस्था/बदली/सारासे-वर्ग-२/२२२३/३२/०४ दि.१०.६.२००४ अन्वये दि.१०.६.२००४ रोजी मध्यान्होत्तर कार्यमुक्त केल्याने सौ.के.के.जिवणे ह्या दि.११.६.२००४ रोजी सकाळच्या वेळेत महानगरपालिका औरंगाबाद येथे जिवशास्त्रज्ञ पदावर रूजू झालेल्या आहेत.

करीता सौ.के.के.जिवणे, जिवशास्त्रज्ञ यांना महानगरपालिकेत जिवशास्त्रज्ञ पदावर दि.११.६.२००४ पासुन एक वर्षाच्या कालावधीसाठी रूजू करून घेण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सौ.के.के.जिवणे, जिवशास्त्रज्ञ यांना महानगरपालिकेत जिवशास्त्रज्ञ पदावर दि.११.६.२००४ पासुन एक वर्षाच्या कालावधीसाठी रूजू करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३३/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता, मनपा यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.३५ समर्थनगर परिसरातील रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणेसाठी सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात रक्कम रूपये ३० लक्ष तरतुद उपलब्ध झाल्यानुसार सन २००३-०४ च्या सा.बां. खात्याच्या जिल्हा दरसुचीतील दर विचारात घेऊन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. या कामाचे अंदाजपत्रक र.रू.२०,२५,६७८/- होत आहे. किमान आवश्यक तेवचढीच कामे करणेचे अटीवर मा.आयुक्त महोदयांनी शिफारस केली आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रूपये २०,२५,६७८/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किमान आवश्यक तेवढीच कामे करणेचे अटीवर प्रभाग क्र.३५ समर्थनगर परिसरातील रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.२०,२५,६७८/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३४/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००४-०५ या अर्थसंकल्पात ईटखेडा गांव ते पैठणरोड रस्त्यावरील नदीवर पुल बांधणे या कामाकरीता आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे.

सदर पुल हा Non D.P. रस्त्यावर पैठण रोड ते इटखेडा गांवाला जोडणाऱ्या अस्तित्वातील रस्त्यावर असलेल्या नदीवर बांधण्याचे प्रस्तावित आहे. प्रस्तावित पुलाच्या जागेजवळ औरंगाबाद मंजुर विकास योजना प्रमाणे असलेल्या नियोजित ६० मी. व १५ मी. तसेच औरंगाबाद पैठण या ६० मी. रूंद रस्त्याचे जंक्शन आहे. सदर डी.पी. रस्त्यांचे alignment व अस्तित्वातील रस्त्याचे alignment हे वेगवेवगळे आहेत. सदर डी.पी. रस्त्यांच्या जागेचे भुसंपादन महानगरपालिकेकडून अद्याप करण्यात आलेले नाही.

प्रस्तावित पुलाचे बांधकाम हे Non D.P. रस्त्यावरील असल्याने व महानगरपालिकेच्या आर्थिक बाबीशी निगडीत असल्याने Non D.P. प्रस्तावावर खर्च करण्याबाबत धोरणात्मक निर्णय धेण्याकरीता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.नंदकुमार घोडेले : या कामासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रू.४० लक्ष ४६ हजार इतकी आहे ती नमूद करावी व तातडीने निविदा काढण्यात यावी.

मा. महापौर : प्रस्ताव मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इटखेडा गांव ते पैठणरोड रस्त्यावरील नदीवर पुल बांधणेच्या कामाकरीता सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात तरतुद असल्याने सदर कामासाठी लागणारा खर्च

करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या कामासाठीचे अंदाजपत्रक र.रू.४०,४६,०००/-ला मंजुरी देण्यात येत असून निविदा काढण्यात यावी.

**विषय क्र. ४३५/६**

शिक्षण अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासन निर्णय दि.१४ नोव्हें.२००३ नुसार महानगरपालिकांच्या शहरांना खेळांसाठी जिल्ह्याचा दर्जा देण्यात येत आहे.

अ) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील येणाऱ्या मनपा शाळा,खाजगी शाळा यांच्या अंतर शालेय स्पर्धांचे संस्थांचे आयोजन महानगरपालिकांनी क्रीडा समिती स्थापन करून करावे.

ब) या स्पर्धा आयोजना करिता येणारा खर्च महानगरपालिकेने करावा.

क) महानगरपालिका हद्दीत स्पर्धा झाल्यानंतर मनपाचा संबंधित खेळात विजयी झालेला संघ हा जिल्ह्याचा संघ मानण्यात यावा.

जिल्हा क्रीडा परिषद : जिल्ह्यातील क्रीडा विकासावर लक्ष व नियंत्रण ठेवणे या हेतूने शासन निर्णय क्र.राक्रीधो-१०९७/प्र.क्र.३६३/क्रीयुसे -१ दि.१५ जून १९९९ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा क्रीडा परिषदेची स्थापना केली असून, आज महाराष्ट्रातील सर्व जिल्हा क्रीडा परिषदांची संस्था नोंदणी अधिनियम -१८६० व विश्वस्त नोंदणी अधिनियम- १९५० अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या आहेत,जिल्हा क्रीडा परिषदा द्वारा जिल्ह्यात खालील प्रमाणे क्रीडा विकासासाठी कामे केली जातात.

१. जिल्ह्यात होणाऱ्या जिल्हा,विभाग,राज्य व राष्ट्रीयस्तरावरील स्पर्धांचे आयोजन व नियोजन करणे.

२. जिल्ह्यातील क्रीडा सुविधांचा आराखडा तयार करून विकास करणे.

३. जिल्ह्यातील तालुका निहाय क्रीडा विकासाचा कृती आराखडा तयार करून तो कार्यान्वित करणे.

४. शासनामार्फ़त आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण शिबीरांचे सनियंत्रण करणे.

५. जिल्ह्यात क्रीडा विकास महोत्सव आयोजन करणे.

६. जिल्ह्यात क्रीडा दिन साजरा करण्यासंबंधात नियोजन करणे.

७. शासनाच्या क्रीडा विषयक योजनांचा जिल्ह्यात प्रचार व प्रसार करणे.

८. जिल्ह्यातील क्रीडा स्पर्धा, महोत्सव,क्रीडा दिन,प्रशिक्षण शिबीरे इ.च्या आयोजनासाठी निधी उभारणे.

वरील शासन निर्णय व क्रीडा स्पर्धा आयोजनाबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये सर्व शालेय महिला व ग्रामिण क्रीडा स्पर्धांचे आयोजन जिल्हा क्रीडा परिषदे मार्फत करण्यात येते.

क्रीडा स्पर्धासाठी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील लोकसंख्या,क्रीडा सुविधा यांचा विचार करून शासनाने शासन निर्णय क्र.रा.क्रीडा -२००३/प्र.क्र./क्रीयुसे-१ दि.२८ नोव्हेंबर २००३ अन्वये महानगरपालिका क्षेत्रांना क्रीडा स्पर्धासाठी तालुकास्तर दर्जाऐवजी जिल्ह्याचा दर्जा प्रदान केलेला आहे या शासन निर्णयान्वये महानगरपालिका कार्यक्षेत्रातील क्रीडा स्पर्धांचे आयोजन महानगरपालिकांनी क्रीडा समिती स्थापन करून करावयाचे आहे व या क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी येणारा खर्च महानगरपालिकांनीच करावयाचा आहे. तथापि, या स्पर्धांचे आयोजन करतांना तांत्रिक बाजू, प्रमाणपत्र प्रदान करणे, क्रीडा निधी जमा करणे या बाबी जिल्हा क्रीडा परिषदेकडेच राहतील कारण जिल्ह्यातील क्रीडा विषयक कामकाज हे शासन नियुक्त जिल्हा क्रीडा परिषदे द्वारे संनियंत्रित करण्यात आलेले आहे. त्यानुसार जिल्हा क्रीडा परिषदेच्या अधिपत्याखाली या शासन निर्णयान्वये महानगरपालिकांनी

''क्रीडा समिती '' स्थापन करून क्रीडा स्पर्धा आयोजनाबाबत कार्यवाही करावी. नियुक्त करण्यात येणाऱ्या समित्यांचे स्वरूप व कार्ये साधारणपणे खालील प्रमाणे असावीत.

**जिल्हा क्रीडा परिषद व महानगरपालिका क्रीडा समिती**

आयुक्त,शिक्षण प्रमुख,जिल्हा क्रीडा अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) क्रीडा विभाग प्रमुख,जिल्हा क्रीडा संघटनांचे प्रतिनिधी (देशी खेळ- २, विदेशी खेळ -२ ) मुख्याध्यापकांचे एक प्रतिनिधी या समितीच्या कार्यकक्षेखाली प्रशासकीय व तांत्रिक बाजू पाहणारी एक समिती व स्पर्धांचे प्रत्यक्ष आयोजन व नियोजन करणारी एक समिती अशा दोन समित्या राहतील.

| **कार्यकारी समिती** | |
|---|---|
| **तांत्रिक व प्रशासकीय समिती** | **स्पर्धा आयोजन व नियोजन समिती** |
| जिल्हा क्रीडा अधिकारी | मा.आयुक्त |
| राज्य क्रीडा मार्गदर्शक | मा.उप आयुक्त (प्र) |
| शिक्षण निर्देशक | मा.मुख्य लेखाधिकारी |
| क्रीडा विभाग प्रमुख | मा.शिक्षणाधिकारी |
| | क्रीडा अधिकारी |

**शासकीय व तांत्रिक समितीची कामे –**

१)प्रवेश अर्ज व क्रीडा निधी जमा करणे.

२)प्रवेश अर्जांची छाननी करून लॉट्स तयार करणे.

३)क्रीडा स्पर्धांचा कार्यक्रम ठरविणे.

४) पंच नियुक्ती करणे.

५)निवड समिती सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

६) तक्रार निवारण समिती नियुक्त करणे.

७) पुढील स्तरावरील स्पर्धेसाठी प्रवेश अर्ज पाठविणे

८) पुढील स्तरावर जाण्यासाठी संघांना निर्देश पत्र देणे.

**आयोजन व नियोजन समितीची कामे –**

१) तांत्रिक समितीशी विचार विनिमय करून स्पर्धांचे ठिकाण निश्चित करणे.

२) संघांची निवास व्यवस्था करणे.

३) स्पर्धेचा उद्घाटन व समारोप समारंभाचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेशी चर्चा करून ठरविणे.

४) स्पर्धेच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे.

५) स्पर्धेसाठी आवश्यक मैदानाची तयारी करणे.

**जिल्हा क्रीडा संकुल समिती**

| | | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | आयुक्त,महानगरपालिका | सदस्य |
| ३ | मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद | सदस्य |
| ४ | जिल्हा पोलिस अधिक्षक | सदस्य |
| ५ | कार्यकारी अभियंता,सा.बा.वि. | सदस्य |
| ६ | उप संचालक,क्रीडा व युवक सेवा | सदस्य |
| ७ | शिक्षणाधिकारी | प्राथमिक सदस्य |
| ८ | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| ९ | जिल्हा क्रीडा अधिकारी | सदस्य,सचिव |

**आमंत्रित**

अ. मा.पालक मंत्री यांनी नामनिर्देशन केलेले व मा.मंत्री क्रीडा यांनी संमत केलेले दोन आमदार.

ब. महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेचे सदस्य

क. मान्यता प्राप्त जिल्हा क्रीडा संघटनेचे प्रतिनिधी

ड. राज्य व राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारार्थी आंतर राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू
(आवश्यकतेनुसार इतर तज्ञ व्यक्तींना देखील आमंत्रित करता येई. )

वरील प्रमाणे शासनाच्या मार्गदर्शक तत्वाच्या अधिन राहून मनपातर्फे क्रीडा स्पर्धांचा (सोबत जोडलेला रू.५,३५,२८०/- कृती आराखडा व प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.)

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १४ नोव्हेंबर २००३ च्या महाराष्ट्र शासन निर्णयाप्रमाणे महानगरपालिकाच्या शहरांना खेळासाठी जिल्ह्याचा दर्जा प्राप्त झाल्यामूळे दि. २८ नोव्हेंबर २००३ च्या शासन निर्णयाप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील क्रिडा स्पर्धाचे आयोजन करणे, क्रिडा स्पर्धासाठी येणारा खर्च करणे, जिल्हा क्रिडा परिषद व महानगरपालिका क्रिडा समिती स्थापन करणे, प्रस्तावात नमुद केलेली विविध समित्या व त्यांची कामे ई. प्रस्तावातील शासनाच्या मार्गदर्शक तत्वाच्या आधीन राहून महानगरपालिकेतर्फे प्रस्तावात नमुद केलेल्या बाबी करण्यास व सोबत जोडलेल्या क्रिडा स्पर्धांचा रू.५,३५,२८०/- रक्कमेच्या कृती आराखड्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३६/७ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभागाचे आदेश क्रमांक टीपीव्ही-४३२००१/१८२९ प्र.क्र. २१६/२००१/नवि-११ दिनांक २५.०२.२००२ अन्वये केंद्र शासनाचे नगर विकास मंत्रालयाचे ''अपंगासाठी अडथळा विरहीत परिसर निर्मिती'' ह्या संकल्पनेसाठी तयार केलेल्या नविन मार्गदर्शीके मधील आदर्श उपविधी राज्य शासनाच्या सर्व सार्वजनिक इमारतींना लागु करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणांच्या बांधकाम उप-विधीत आवश्यक ते बदल करण्यांस सुचविले होते. विकलांगसाठी अडथळा विरहीत परिसर निर्मितीसाठी केंद्र शासनाच्या विकलांग व्यक्ती (समानसंधी,अधिकाराचे संरक्षण आणि संपूर्ण सहयोग ) अधिनियम १९९५ मधील आठव्या प्रकरणातील कलम ४६ मध्ये तरतूद असून त्या अनुषंगाने राज्यशासन व स्थानिक प्राधिकरणांनी आपल्या आर्थिक कुवतीच्या मर्यादेत विवक्षित सुविधा पुरवाव्यात असे बंधन घालून दिलेले आहे.

केंद्र शासनाच्या उक्त सुचना विचारांत घेऊन महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका/ नगर परिषद, विशेष नियोजन प्राधिकरणे इत्यादीच्या नव्याने बांधण्यांत येणाऱ्या सर्व प्रकारच्या सामन्य जनते कडून वापरल्या जाणाऱ्या सार्वजनिक स्वरूपाच्या इमारतींना विकलांगासाठी अडथळा विरहीत परिसर निर्मिती करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने सन १९९८ साली तयार केलेल्या मार्गदर्शीकेतील आदर्श उपविधी लागु करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. मात्र त्या करीता सदर उपविधीचा महानगरपालिका, नगर परिषद व इतर प्राधिकरणांच्या विकास नियंत्रण नियमावलीत समावेश करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे आवश्यक होते.

तथापि, वरील दि.२५.०२.२००२ रोजीच्या आदेशावर काही महानगरपालिका फेरबदलाचा प्रस्ताव कार्यान्वित करण्याबाबत शासनास उदासिन दिसून आल्यामूळे सदर नियमाची तात्काळ अंमलबजावणी होणे बाबत सार्वजनिक हित लक्षात घेता प्रस्तुत प्रकरणी सर्व महानगरपालिका व सर्व ''अ'' वर्ग नगर परिषदांना उक्त अधिनियमाच्या कलम-१५४ अन्वये शासन, नगर विकास विभाग

यांचेकडील आदेश क्रमांक -टीपीव्ही-४३२००१/१८२९/प्र.क्र.२१६/२००१/नवि-११ दिनांक २ डिसेबंर,२००३ अन्वये खालील प्रमाणे निदेश देण्यात आले आहेत:-

**निदेश**

१. केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाने विकलांगासाठी अडथळा विरहीत परिसर निर्मितीसाठी इमारतीत आवश्यक त्या सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने नवीन आदर्श उपविधी तयार केलेली असून त्याची प्रत सोबत जोडलेली आहे. त्यादृष्टीने ज्या महानगरपालिका व ''अ'' वर्ग नगरपरिषदा यांनी अद्याप कार्यवाही केली नसेल अशा सर्व महानगरपालिका व सर्व ''अ'' वर्ग नगर परिषदांना त्यांच्या विकास नियंत्रण नियमावलीत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम -३७ (१) अन्वये फेरबदल करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी तात्काळ पाठवावा,

२. उक्त फेरबदल सदर आदेशाच्या दिनांकापासून (दि.२ डिसेबंर,२००३) अंमलात येईल.

३. उक्त फेरबदल विद्यमान तसेच नव्याने बांधण्यात येणाऱ्या सर्व इमारतीसाठी लागू राहतील.

करीता औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावली मध्ये सदर उपविधी समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील सदर उपविधी समाविष्ट करतांना '' अपंगासाठी अडथळा विरहीत परिसर निर्मिती '' ह्या उपविधीचा क्रमांक नियम क्र.३० असा राहील ह्यांत. [1] SHORT TITLE, EXTENT AND COMMENCEMENT, [2] DEFINITIONS, [3] SCOPE, [4] SITE DEVELOPMENT, [5] BUILDING REQUIRMENTS हे मुद्दे राहतील ह्या उपविधीची प्रत सोबत जोडली आहे. तरी सदर उपविधी महानगरपालिका औरंगाबाद विकास नियंत्रण नियमावलीत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सामाविष्ट करणेची मान्यतेस्तव व मान्यतेनंतर त्यावर हरकती/सुचना मागवून कलम ३७ ची कार्यवाही पूर्ण करून सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करण्याचे अधिकार मा.आयुक्त महानगरपालिका यांना देण्यांचे मान्यतेस्तव सादर.

**Accompaniment in government in Urban Development Departments Notiffication No. TPB 132001/1829/CR-216/2001/UD-11 dated 2nd December, 2003.**

**30. Model building bye-laws to provide facilities for physically handicapped persons.**

**BYE-LAWS**

30.1 SHORT TITLE, EXTENT & COMMENCEMENT :

30.1.1 These bye-laws shall be annexed to the Aurangabad Municipal Bye-Laws.

30.1.2 They shall extend to the whole Area of the corporation of Aurangabad.

30.1.3 They shall come into force fromthe date of 2 nd December, 2003.

30.2 DEFINITIONS :

**30.2.1** **Non - ambulatory Disabilities:-** Impairments that, regardless of cause or manifestation, for all practical purposes, confine indiveduals to wheelchairs.

**30.2.2** **Semi-ambulatory Disabilities:-** Impairments that cause individuals to walk with difficulty or insecurity, Individuals using braces or crutches, amputees, aribritics, spastics, and those with pulmonary and cardiacills may be semi-ambulatory.

**30.2.3** **Hearing Disabilities :-** Deafness of hearing handicaps that might make an individual insecure in public areas because he is unable to communicate on hear warning signals.

**30.2.4** **Sight Disabilities:-** Total blindness or impairments affecting sight to the extent that the individual, functioning in public areas, is insecure or exposed to danger.

**30.2.5** **Wheel Chair :-** Chair used by disabled people for mobility. The standard size at wheel chair shall be taken as 1050 mm. X 750 mm.

30.3 **SCOPE :-**

These bye laws are applicable to all existing and proposed builidings and facilities used by the public.

**30.4 SITE DEVELOPMENT :-**

Level of the roads, access paths and parking areas shall be described in the plan along with specification on the materials.

**30.4.1** **Access path/ walk way :-** Access path from plot entry and surface parking to building entrance shall be of minimum of 1800 mm. wide having even surface without any slope. Slope if any shall not have gradient greather than 5% Finishes shall have a no slip surface with a texture traversable by a wheel chair. Curbs wherever provided shall blend to a common level.

**30.4.2** **Parking :-** For parking of vehicle of handicapped people, the following provisions shall be made:-

a] Surface parking for two car spaces shall be provided near entrance for the physically handicapped persons with maximum travel distance of 30 mt. from building entrance.

b] The width of parking bay shall be minimum 3.60 mt.

c] The information stating that the space is reserved for wheel chair users shall be conspicuously displayed.

**30.5** **Building Requirements :-** The specified facilities for the building for physically handicapped persinas shall be as follows:-

1. Approach to plinth level.
2. Corridor connecting the entrance/ exit for the handicapped.
3. Stairways.
4. Lift.
5. Toilet.
6. Drinking Water.

**30.5.1.1** **Approach to plinth Level :-** Every building should have atleast one entrance accessible to the handicapped and shall be indicated by proper signage. This entrance shall be approached through a ramp together with the stepped entry.

30.5.1.2 Ramped Approach :- Ramp shall be finished with no slip material to enter the building. Minimum width of ramp shall be 1800 mm. with maximum gradient 1.12 Length of ramp shall not exceed 9.0 mt. Having 800 mm. High hand rail on both sides extending 300 mm. Beyond top and bottom of the ramp. Munimum gap from the adjacent wall to the hand rail be 50 mm.

**30.5.1.3** **Stepped Approach :-** For stepped approach size of tread shall not be less than 300 mm. And maximum riser shall be 150 mm. Provision of 800 mm. high hand rail on both sides of the stepped approach similar to the ramped approach.

**30.5.1.4** **Exit / Entrance Door : -** Minimum clear opening of the entrance door shall be 900 mm. And is shall not be provided with a step that obstructed the passage of wheel chair user. Threshold shall not be raised more than 12 mm.

**30.5.1.5** **Entrance Landing :-** Entrance landing shall be provided adjacent to ramp with the minimum dimension 1800 x 2000 mm. Finishes shall have a non-slip surface with a texture traversable by a wheel chair. Curbs wherever provided should blend to a common level.

**30.5.2** **Corridor Connecting the Entrance / Exist for the Handicapped :-** The corridor connecting the outdoors to a place where information concerning the overall use of the specified building can be provided to visually impaired persons either by a person or by signs, shall be provided as flows:-

a] The minimum width shall be 1500 mm.

b] In case there is a difference of level slope ways shall be provided with a slope lf 1:12.

c] Hand rails shall be provided for ramps / slope ways.

30.5.3 Stair Ways :- One of the stair - ways near the entrance / exist for the hanicapped shall have the following provisions :-

a] The minimum width shall be 1350 mm.

b] Height of the riser shall not be more than 150 mm. And width of the tread 300 mm. The steps shall not have abrupt [square] nosing.

c] Maximum number of risers on a flight shall be limited to 12.

d] Hand rails shall be provided on both sides and shall extend 300 mm. On the top and bottom of each flight of steps.

**30.5.4** **Lifts :-** Wherever lift is required as per bye-laws, provision of at least one lift shall be made for the wheel chair user with the following cage dimensions :-

Clear internal depth : 1100 mm.
Clear internal width : 2000 mm.
Entrance door width : 900 mm.

a] A hand rail not less than 600 mm. Long at 1000 mm. Above floor level shall be fixed adjacent to the control panel. Also, switch control shall be at an operating height equal to that of hand rails.

b] The lift lobby shall be of an inside measurement of 1800 x 1800 mm. or more.

c] The time of an automatically closing door should be minimum 5 second and the closing speed should not exceed 0.25 M/ sec.

d] The interior of the case shall be provided with a device that audibly indicates the floor the cage has reached and indicates that the door of the cage for entrance / exist is either open or closed.

**30.5.5** **Toilets :-** One special W.C. in a set of toilet shall be provided for the use of handicapped with essential provision of wash basin near the entrance for the handicapped :-

a] The minimum size shall be 1500x 1750 mm.

b] Munimum clear opening of the door shall be 900 mm. and the door shall swing out.

c] Suitable arrangement of vertical / horizontal with 50 mm. Clearance from wall shall be made in the toilet.

d] The W.C. seat shall be 500 mm. from the floor.

**30.5.6** **Drinking Water :-** Suitable provision of drinking water shall be made for the handicapped near the special toilet provided for them.

**30.5.7** **Designing for Children :-** In the buildings meant for the predominant use of the children, it will be necessary to suitably alter the height of the handrail and other firings and fixture etc.

**नगरविकास विभाग यांच्याकडील शासकीय ज्ञापन क्रमांक टि.पी.बी. १३२००१ /१८२९ सी.आर.-२१६/२००१/नगर विकास-११ दिनांक ०२.१२.२००३ सोबतचे परिशिष्ट**

३० शाररीक दृष्ट्या अपंगव्यक्तिंना सुविधा पुरविण्यासाठी बांधकामाबाबत आदर्श उपबंधाची रचना करणे

**३०-१.** **संक्षिप्त शीर्षक, व्याप्ती आणि आरंभ :-**

३०-१-१ ही उपबंधे औरंगाबाद महानगरपालिकेच्या उपबंधास जोडले जातील.

३०-१-२ ते महानगरपालिकेच्या संपूर्ण क्षेत्रास लागु राहतील.

३०-१-३ ते दिनांक ०२ डिसेंबर -२००३ पासून अंमलात असल्याचे मानन्यात येईल.

**३०-२** **व्याख्या :-**

**३०-२-१** **चालता फिरता न येण्याच्या असमर्थता**

सर्व प्रत्यक्ष व्यवहारासाठी, कारणे व प्रगटीकरण विचारात न घेता, व्यक्तिंना चक्र -खुर्चीस जखडून ठेवणे.

३०-२-२ चालता फिरता न येण्याची अर्ध - असमर्थता :-

दुर्बलता ज्यामुळे व्यक्तींना मुश्कीलीने व असुरक्षिततेने चालावे लागते, व्यक्ती ज्या लावण्यासाठी जोमदार उपकरण किंवा कुबड्याचा वापर करतात, अवयव कापून टाकले असे, ॲरीक्रिटीक्स, मेंदूत पक्षघात झालेले, आणि ते ज्यांना

पलमोनरी (रक्त वाहीनी) व हृदय विकार, आहेत असे अर्ध-असमर्थ समजले जातील.

**३०-२-३ श्रवण असमर्थता :-**

बहिरेपणा यामुळे ऐकण्याची अपंगता एखाद्या व्यक्तिस येते, सार्वजनिक क्षेत्रामध्ये असुरक्षित असल्याचे वाटते कारण आवाजी दक्षता- इशारे त्यांच्या पर्यंत पोहचत नाहीत.

**३०-२-४ दृष्टी विषयक असमर्थता :-**

संपूर्ण आंधळेपणा किंवा दृष्टीतील अंधूकपणा या हद्दीपर्यंत की सार्वजनिक क्षेत्रात काम करण्यास असुरक्षितता वाटणे किंवा धोक्याला सामोरे असणे.

**३०-२-५ चक्र खुर्ची :-**

पांगळ्या लोकांनी फिरण्यासाठी वापरात आणावयाची खुर्ची, चक्र खुर्चीचा आकार १०५० मी.मी.× ७५० मी.मी. असावा.

**३०-३ व्याप्ती :-**

हे उपबंध अस्तित्वात असलेल्या आणि प्रस्तावित इमारतींना जनतेतर्फे वापरात असतांना सुविधांना, या सर्व लागू आहेत.

**३०-४ कार्यस्थळ (साईट) विकास :-**

रस्त्याची पातळी, पोच रस्ते आणि गाड्या थांब्याचे क्षेत्राचे वर्णन.

वापरण्यात येणाऱ्या बांधकाम साहित्यांच्या वर्णनासह नकाशात असते.

**३०-४-१ प्रवेश मार्ग / पायवाट :-**

भूखंड प्रवेशापासून प्रवेश रस्ता आणि भूस्तर थांबा जेथून इमारतीत प्रवेश करता येतो, कमीत कमी १८०० मि.मी. रूंदीचा सम पातळीत कोणत्याही उताराशिवाय असावा. जर एखादा उतार असला तर त्याचा चढ ५ टक्क्यांपेक्षा अधिक नसला पाहीजे बांधकामाचे टोकाचे भाग घसरड्या पृष्ठ भागाचे नसावे, तिरपी चढण किंवा दगड-मातीची तटबंदी आडवी व येण्यासह चक्रखुर्ची ने फिरता न येण्यासारखी असू नयेत. ठिकठिकाणी समपातळीवर अंकूश लावले असता ते समापातळीवर मिसळून गेलेले असावे.

**३०-४-२ थांबा :-**

अपंग व्यक्तिच्या वाहनाच्या थांब्यासाठी खालील तरतुदी असल्या पाहिजेत.

अ) प्रवेश ठिकाणाजवळ शारीकदृष्ट्या अपंग व्यक्तीसाठी दोन मोटार गाड्या थांबू शकतील एवढी जागा जिचा प्रवास अंतर जास्तीत जास्त इमारत प्रवेशापासून ३० मीटर पर्यंत असला पाहिजे.

ब) थांब्याच्या आवाराची रूंदी कमीत कमी ३.६० मीटर असली पाहिजे.

क) चक्रखुर्ची वापरणाऱ्याच्या थांब्यासाठी जागा राखून ठेवल्याबाबतची माहिती दर्शविणारा फलक ठिकठिकाणी लावण्यात आला पाहिजे.

**३०-५ इमारतीच्या गरजा :-**

शारीरीक दृष्ट्या अपंग व्यक्तींच्यासाठी इमारतीच्या विशिष्ट सुविधा खालीलप्रमाणे असल्या पाहिजेत.

१) जोत्याच्या पातळीपर्यंत पोहचण्यासाठी मार्ग

२) अपंगाना इमारतीतील प्रवेश स्थळाकडे नेणारा जोड मार्ग/निर्गमन मार्ग

३) जिने

४) विजेवर चालणारे उदवाहन

५) स्वच्छतागृह

६) पिण्याचे पाणी

**३०-५-१-१ जोत्याच्या पातळीस येवून मिळणारे प्रवेश मार्ग :-**

प्रत्येक इमारतीस कमीत कमी एक प्रवेश असावा जो अपंगासाठी योग्य रितीने चिन्हाकिंत असला पाहिजे. या प्रवेशाच्या ठिकाणी एक उतरंडीद्वारे उंचावलेल्या प्रवेशाससह पायऱ्या पण असाव्यात.

**३०-५-१-२ उतरंडीचा प्रवेश मार्ग :-**

उतरंडीचे बांधकाम अशा रीतीने असले पाहिजे की, घसरण होईल असा कोणताही माल इमारतीच्या प्रवेशाचे ठिकाणी वापरला जावू नये. उतंरडीची कमीत कमी रूंदी १८०० मी.मी. व जास्तीत जास्त १.१२ उतार निर्देशांक असलेली असावी. उतरंडीची लांबी ९.०० मीटर पेक्षा जास्त नसावी, जिला दोन्ही कडून ८०० मि.मि. उंचीचे कठडे जे उतरंडीच्या उंचीचे टोक व तळापासून ३०० मि.मी. च्या पूढे असले पाहिजे. सोबत लागून असलेली भिंत व कठडा यामध्ये कमीत कमी उंतर ५० मी.मी. असावे.

**३०-५-१-३ पायऱ्यांचा पोचमार्ग :-**

जिन्याद्वारे प्रवेशासाठी जिन्याच्या पायरीचा पृष्ठभाग ३०० मी.मी.पेक्षा कमी नसला पाहिजे आणि पायरीची उंची जास्तीत जास्त १५० मि.मि. उतरंडीच्या पोचमार्गा प्रमाणेच पायऱ्यांच्या पोच मार्गाचे दोन्ही बाजूस ८०० मी.मी. उंचीचे कठडे असावेत.

**३०-५-१-४ निर्गमण / प्रवेशद्वार :-**

प्रवेशद्वाराची कमीत कमी स्पष्ट उघडणारा भाग ९००मि.मि.चा असला पाहिजे व त्यात पायरीचा समावेश नसावा, ज्यामुळे चक्रखुर्ची वापरण्यास अडथळा येवू शकेल. उंबरठ्याची उंची १२ मि.मि. पेक्षा जास्त करू नये.

**३०-५-१-५ प्रवेशाची सपाट जागा :-**

उतरंडीला लागून प्रवेशाची सपाट जागा असावयास पाहिजे जीचा कमीत कमी आकार १८०० बाय २००० मि.मी. असला पाहिजे. पृष्ठभाग घसरणीचा नसावा व तीचे स्वरूप चक्रखुर्चीद्वारा पार करता येण्यासारखे असावे. जेथे जेथे आकुशाचा वापर आहे तेथे सम पातळीत मिळविलेले असावेत.

**३०-५-२ अपंगासाठी प्रवेश व निर्गम जोडणारा पट्टा :-**

दृष्टीने अधु असलेल्या लोकांसाठी संबंधित माहिती ही विशिष्ट इमारतीच्या वापराबाबतची संपूर्ण माहिती ही त्या स्थळाच्याबाह्य दाराला (गेटजवळ ) जोडणाऱ्या मार्गाचे सुरूवातीस वैयक्तिकरीत्या किंवा संकेत फलकाद्वारे ठळकपणे खालील प्रमाणे लावण्यात आली पाहिजे :-

अ) कमीत कमी रूंदी १५०० मि.मी.असावी.

ब) उतार पातळी बाबत फरक असल्यास नेहमी प्रमाणे १:१२ या वर्णनाच्या उताराची तरतुद केली पाहिजे.

क) उतरंड्या आणि उतार रस्त्यावर हात-कठड्याची तरतुद करावयास पाहिजे.

**३०-५-३ जिने :-**

प्रवेश निर्गमनाजवळ असलेल्या जिन्यामध्ये एक जिना हा अपंगासाठी खालील प्रमाणे तरतुदीचा असला पाहिजे.

अ) कमीत कमी रूंदी १३५० मि.मि.असली पाहिजे.

ब) चढावयाच्या पायरीची उंची १५० मि.मी.पेक्षा जास्तीची नसावी. जीचा पृष्ठभाग ३०० मि.मी.रूंदीचा असावा. जिन्याच्या पायऱ्याचे टोक (चौरस) अनुकूचिदार नसावेत.

क) एका चढीसाठी जिन्यास १२ पायऱ्यांची सीमा न ओलांडली गेली पाहिजे.

ड) दोन्ही बाजुस हाताकठड्याची तरतूद असली पाहिजे. जी जिन्याचे वरचे टोक आणि तळ्याचे टोक या दरम्यान प्रत्येक पायरीस ३०० मी.मी. पर्यंत विस्तारली गेली पाहिजे.

**३०-५-४ उदवहने :-**

उपबंधानुसार जेथे जेथे उदवहानाची आवश्यकता आहे तेथे किमान एक उदवहनाची तरतूद खालील पिंजऱ्याच्या आकाराची तरतूद केली पाहिजे.

आत-आत स्पष्ट खोली :- ११०० मि.मि.

आत-आत रूंदी :- २००० मि.मि.

प्रवेशद्वाराची रूंदी :- ९०० मि.मि.

अ) कमीत कमी ६०० मि.मि. कठडे ज्यांची लांबी १००० मि.मि. आहे ते फरस बंदीवर नियंत्रण कर्त्याजवळ बसविले पाहिजे तसेच स्वीच कंट्रोल, ऑपरेटींग हॉईट इतक्या उंचावर असावा जी कठड्याच्या बरोबर उंचीची असावी.

ब) उदवहन प्रतिक्षालयाच्या आतील आकार १८०० मि.मि. बाय १८०० मि.मि. मोज मापाचा किंवा त्यापेक्षा जास्त असले पाहिजे.

क) आपोआप बंद होणाऱ्या दरवाज्याचा बंद होण्याचा अवधी ५ सेंकद आणि बंद होण्याचा वेग ०.२५ मि.प्रतिसेकंद असला पाहिजे.

ड) उदवाहनाच्या आतील बाजूस असे श्रवण उपकरण लावण्याची तरतूद असली पाहिजे ज्यायोगे पिंजऱ्याची फरसबंदी त्या त्या मजल्यावर पोहचल्याचा खबर मिळेल आणि पिंजऱ्याचा दरवाजा प्रवेश/ निर्गमनासाठी उघडा किंवा बंद आहे तेही लक्षात येईल.

**३०-५-५ स्वच्छता गृहे :-**

स्वच्छतागृहामध्ये एक खास शौचालय, अपंगाच्या वापरात असावे जेथे प्रवेशाजवळच आवश्यक वॉश बेसीनची तरतुद असली पाहिजे.

अ) कमीत कमी आकार १५०० मि.मि. बाय १७५० मि.मि. असला पाहिजे.

ब) उघडल्यानंतर दरवाज्याची स्पष्ट रूंदी ९०० मि.मि. असली पाहिजे आणि तो बाहेरच्या बाजुनी उघडला पाहिजे.

क) ५० मि.मि. ची उभी / आडवी खेळती जागा राहावी यासाठी योग्य ती व्यवस्था असली पाहिजे.

ड) शौचालयाचे आसन हे फरसबंदी पासून ५०० मि.मि. वर असावे.

**३०-५-६ पिण्याचे पाणी :-**

पिण्याच्या पाण्याची अपंगासाठी खास प्रसाधनाजवळ योग्य ती तरतुद केली पाहिजे.

**३०-५-७ मुलांसाठी सर्वसाधारण रचना :-**

इमारती ज्या प्रामुख्याने मुलांसाठी आहेत तेथे हातकठड्याची उंची योग्यरित्या बदलणे आवश्यक असेल. त्याच प्रमाणे इतर उपकरणे आणि कायमच्या बसविलेल्या वस्तु देखील योग्य रित्या बदल करावेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासनाच्या नगर विकास मंत्रालयाने विकलांगासाठी अडथळा विरहीत परिसर निर्मितीसाठी इमारतीत आवश्यक त्या सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने केलेली व प्रस्तावा सोबत जोडलेली नविन आदर्श उपविधी औरंगाबाद महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करण्यासाठी प्रस्तावा सोबत जोडलेल्या निदेशातील, शासन निदेशातील अटीस अधीन राहून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास आणि सदर कार्यवाही अंतर्गत अधि सूचना प्रसिध्द करणे,सूचना व हरकती मागवून हित संबंधितांना सुनावणी देणे व परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याचे अधिकार आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३७/८ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ज्योतीनगर व परिसरास पाणी पुरवठा व्यवस्था करण्यासाठी अस्तित्वातील मुख्य जलवाहिनीवरील वितरणाचा भार कमी करण्यासाठी स्टेट बँक कॉलनी या मंजूर रेखांकनातील खुल्या जागेमध्ये १५.०० लाख लिटर्स क्षमतेचा जलकुंभ बांधणे व वितरण व्यवस्था करणे, तसेच संरक्षित भिंत व वॉचमन खोली बांधण्यासाठीचे एकत्रित अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची सन २००४-२००५ च्या दरसूची नुसार रूपये १,२२,६४,५२७/- एवढ्याचे तयार करण्यांत असले असून त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाच्या तरतुदी मधून करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रूपये १,२२,६४,५२७/- चे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्योतीनगर व परिसरास पाणी पुरवठा व्यवस्था करण्यासाठी अस्तित्वातील मुख्य जलवाहिनीवरील वितरणाचा भार कमी करण्यासाठी स्टेट बँक कॉलनी या मंजुर रेखांकनातील खुल्या जागेमध्ये १५.०० लाख लिटर्स क्षमतेचा जलकुंभ बांधणे व वितरण व्यवस्था करणे, तसेच संरक्षित भिंत व वॉचमन खोली बांधण्यासाठीचे तयार करण्यात आलेले एकत्रित अंदाजपत्रक रक्कम रूपये १,२२,६४,५२७/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३८/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,३) शहरी भागात नविन कॉंक्रींट रस्ते तयार करणे या लेखाशिर्ष मध्ये पान क्र.१३६ वर अ.क्र.२९- प्रभाग क्र.३८ बेगमपुरा भागात कॉंक्रींट रस्ते तयार करणे रू.२.०० लक्ष या नावांत बदल करून प्रभाग क्र.३८ बेगमपुरा भागात कॉंक्रीट व शाहबादी फ़रशी असलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे असे करण्यात यावे.

४) शहरी भागात रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे या लेखाशिर्ष मध्ये पान क्र.१४१ वर अ.क्र.७४ प्रभाग क्र.३८ पुर्नडांबरीकरण करणे रू.३.०० लक्ष असे नमूद आहे हे लेखाशिर्ष रद्द करून जलनि:स्सारण विभागाच्या लेखाशिर्ष (३) शहरी भागात खुल्या गटारी बांधणे पान क्र.१७४/१७५ मध्ये बेगमपुरा भागात अर्ध गोलाकार गटार बांधणे रू.३.०० लक्ष असे समाविष्ट करण्यात यावे तसेच

२) नविन खडी रस्ते या लेखा शिर्षात पान क्र.१३४ वर अ.क्र.३२ - प्रभाग क्र.३८ कर्मचारी कॉलनी येथे रस्त्याचे खडीकरण करणे रू.२.०० लक्ष या कामात रू.१.६२ रू.ची बचत झालेली आहे तरी ही बचत ३) रस्ते दुरूस्ती (पॅचवर्क) पान क्र.१४२ या लेखा शिर्षात समाविष्ट करावी.

सुचक : श्री.किशोर शिंदे अनुमोदक: श्री.विकास जैन, श्री.जावेद कुरैशी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३८ मधील नविन कॉंक्रींट रस्ते तयार करणे साठी पान क्र.१३६ वर अ.क्र.२९ वर ठेवण्यांत आलेली रू.२.०० लक्षची तरतूद या ऐवजी प्रभाग क्र.३८ बेगमपुरा

भागात काँक्रीट व शाहबादी फ़रशी असलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणेस,व पान क्र.१४१ वर अ.क्र.७४ वर ठेवण्यांत आलेली तरतूद रू.३.०० लक्ष या ऐवजी बेगमपुरा भागात अर्ध गोलाकार गटार बांधणेस,तसेच पान क्र.१३४ वर अ.क्र.३२ कर्मचारी कॉलनी येथे रस्त्याचे खडीकरण करणे रू.२.०० लक्ष या कामात झालेली बचत रू.१.६२ मध्ये रस्ते दुरूस्ती (पॅचवर्क) पान क्र.१४२ या लेखा शिर्षात समाविष्ट करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४३९/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७९ मधील जलवाहिणी टाकण्यासाठी अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र.१५५ अ.क्र.८७ अन्वये १ लाखाची अंदाजपत्रकीय तरतुद ठेवण्यात आलेली आहे. सदर वार्ड क्र.७९ मध्ये उक्त कामासाठी सध्या आवश्यकता नसल्याने वार्ड क्र.२५ मध्ये जलवाहिणी टाकण्यासाठी वर्ग करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.जगदिश कन्हैय्यालाल सिध्द अनुमोदक : श्री.नंदकुमार फुलारी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७९ साठी जलवाहीनी टाकण्या करीता ठेवण्यात आलेली तरतूद वळती करून वार्ड क्र.२५ मध्ये जलवाहीनी टाकणेसाठी वापरण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४०/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.७४ मधील विकास कामासाठी अर्थसंकल्प २००४-२००५ मध्ये दिलकश हॉटेल ते रामविहार सोसायटी येथे आर.सी.सी.गटर बांधण्याबाबत पृष्ठ क्र.१७५ अ.क्र.२६ अन्वये १० लाख अंदाज पत्रकीय रक्कमेची तरतुद ठेवण्यात आली होती. सदरील कामाचे अंदाजपत्रक संबंधीत विभागाकडून तयार करण्यात आले आहे, त्यानुसार अंदाज पत्रकीय रक्कम ५ लाख होते, तसेच पृष्ठ क्र.१०८ अ.क्र.१६ अन्व्ये गल्ली १ ते ८ पुर्नडांबरीकरण करण्यासाठी १० लाख अंदाज पत्रकीय तरतुद ठेवण्यात आलेली आहे. आर.सी.सी.गटर बांधण्याच्या अर्थसंकल्पातील अंदाजपत्रकीय तरतुदी नुसार ५ लाख उर्वरीत रक्कम व गल्ली क्र.१ ते ८ पुर्नडांबरीकरणसाठी ठेवण्यात आलेली १० लाख अंदाज पत्रकीय रक्कम अशी एकूण १५ लाख ही प्रभागातील विविध गल्ल्या समोरून ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी वर्ग करण्याबाबत सर्वानुमते मंजुरी द्यावी.

सुचक : श्री.भरत लकडे,

अनुमोदक : श्री.जयवंत ओक, श्री.किशनचंद तनवाणी,श्री.नंदकुमार फुलारी, श्री.रणधीरसिंह होलिये

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.७४ साठी अर्थसंकल्प २००४-२००५ मध्ये ठेवण्यांत आलेली एकूण रक्कम रू.१५ लक्ष त्याच प्रभागात विविध गल्ल्या समोरून ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी वर्ग करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४१/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पामध्ये पान क्र.१३७ वर अ.क्र.६१ वरील प्रभाग क्र.५७ संजयनगर स्लम येथील रस्त्याचे काँक्रेटींग करण्यासाठी २ लक्ष रूपयांची तरतुद करण्यात आलेली आहे. परंतु सदरील काम शहर अभियंता विभागाकरीता ठेवलेल्या तरतुदीऐवजी अतिरिक्त शहर अभियंता यांचे विभागा अंतर्गत छपाई झालेले आहे. त्यामुळे संबंधीत स्लम विभागाचे अधिकारी काम करण्यास तयार नाहीत. प्रशासनाच्या चुकीमुळे सदरील काम अतिरिक्त शहर अभियंता विभागात समाविष्ट झालेले आहे.

करीता संजयनगर स्लम भागात रस्त्याचे कॉंक्रेटींग करण्याचे कामाची तरतुद शहर अभियंता विभागांतर्गत करण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक: श्री.अशरफ़ मोतीवाला, अनुमोदक : श्री.मीर हिदायत अली

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पामध्ये पान क्र.१३७ वर अ.क्र.६१ वरील प्रभाग क्र.५७ संजयनगर स्लम येथील रस्त्याचे कॉंक्रेटींग करण्यासाठी २ लक्ष रूपयांची तरतुद करण्यात आलेली आहे. परंतु सदरील काम शहर अभियंता विभागाकरीता ठेवलेल्या तरतुदीऐवजी अतिरिक्त शहर अभियंता यांचे विभागा अंतर्गत छपाई झालेले असल्यामूळे व संबंधीत स्लम विभागाचे अधिकारी काम करण्यास तयार नसल्यामूळे संजयनगर स्लम भागात रस्त्याचे कॉंक्रेटींग करण्याचे कामाची तरतुद शहर अभियंता विभागांतर्गत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४२/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.६५,खडकेश्वर जलवाहिणीसाठी अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.१५७ अ.क्र.१२४ साठी रूपये २०००००/- तरतुद केली आहे. त्यापैकी रूपये १०००००/- वार्ड क्र.१७ प्रभागात खर्च करावा.

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, गारखेडा, परिसर श्री.माणिक देशपांडे दवाखाना परिसर व रामकृष्ण नगर, सतिश पंढरपुरकर व विनायक देशमुख यांच्या घराजवळ ३ किंवा ४ इंची जलवाहिनी टाकण्यासाठी वार्ड क्र.१७ प्रभागात रूपये १०००००/- खर्च करावा. ही विनंती.

सुचक: श्री.जयवंत ओक अनुमोदक: श्री.प्रल्हाद निमगांवकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.६५,खडकेश्वर जलवाहिणीसाठी अर्थसंकल्पात पृष्ठ क्र.१५७ अ.क्र.१२४ साठी ठेवण्यांत आलेली र.रू.२०००००/- तरतुदी पैकी रूपये १०००००/- वार्ड क्र.१७ प्रभागात गारखेडा, परिसर श्री.माणिक देशपांडे दवाखाना परिसर व रामकृष्ण नगर, सतिश पंढरपुरकर व विनायक देशमुख यांच्या घराजवळ ३ किंवा ४ इंची जलवाहिनी टाकण्यासाठी वार्ड क्र.१७ मध्ये रूपये १०००००/- खर्च करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४३/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००४-२००५ मध्ये प्रभाग क.५२ साईनगर रस्त्याच्या पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामासाठी अंदाज पत्रकीय रक्कम रू.५ लाख तरतुद ठेवण्यात आले होती. सदर कामाचे १ लाख २० हजार अंदाज पत्रक संबंधीत विभागाने तयार केले असून या कामासाठी ठेवण्यात आलेल्या तरतुदी नुसार ३ लाख ८० हजार उर्वरीत रक्कम ही प्रभाग क्र.५२ अविष्कार कॉलनी येथील गल्ल्याचे सिमेंट कॉंक्रींट करण्याच्या कामासाठी वर्ग करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात यावी.

सुचक: श्री.सोपान पारे अनुमोदक : श्री.किशनचंद तनवाणी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००४-२००५ मध्ये प्रभाग क.५२ साईनगर रस्त्याच्या पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामासाठी ठेवण्यांत आलेली अंदाज पत्रकीय रक्कम रू.५ लाख तरतुदी मधुन सदर कामाचे १ लाख २० हजार अंदाज पत्रक संबंधीत विभागाने तयार केलेले असल्यामूळे सदरील तरतुदीनुसार उर्वरीत रक्कम रू.३ लाख ८० हजार प्रभाग क्र.५२ अविष्कार कॉलनी येथील गल्ल्याचे सिमेंट कॉंक्रींट करण्याच्या कामासाठी वर्ग करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४४/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संगिता कॉलनी येथील मनपाच्या खुल्या जागेत स्केटिंग ट्रॅक करण्यासाठी ५.०० लाख रू.चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात ठेवण्यात आले होते. सदरील जागा छोटी असल्यामुळे तेथे स्केटिंग ट्रॅक करता येत नाही. तरी सदरील कामावरची रक्कम लक्ष्मी कॉलनी येथील खुल्या जागेत जिमनॅझियम हॉल बांधण्यासाठी वापरण्यात यावा.

सुचक : श्री.सुनिल मगरे अनुमोदक: श्री.किशनचंद तनवाणी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संगिता कॉलनी येथील मनपाच्या खुल्या जागेत स्केटिंग ट्रॅक करण्यासाठी चालु अर्थसंकल्पात ठेवण्यांत आलेली र.रू. ५.०० लाखाची तरतूद लक्ष्मी कॉलनी येथील खुल्या जागेत जिम्नॅशियम हॉल बांधण्यासाठी वापरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४५/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.३ येथील जयसिंगपुरा चौक विकसीत करणे बाबत अर्थसंकल्प २००४-०५ मध्ये सदरील कामासाठी पान क्र.१४३ व अ.क्र.५ वर रक्कम रूपये ३ लाखाची आर्थिक तरतुद करण्यात आलेली होती परंतु मोहल्ला कुतुबपुरा येथील विविध भागात हाफ़ राऊंड गटार तयार करणे फ़ार जरूरीचे झाले आहे.

तरी हाफ़ राऊंड गटारच्या कामासाठी सदरील रक्कम वर्ग करण्यात यावे करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.साजेदा बेगम अनुमोदक : श्री.मीर हिदायत अली, श्री.किशोर शिंदे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३ येथील जयसिंगपुरा चौक विकसीत करणेच्या कामासाठी अर्थसंकल्प २००४-०५ मध्ये पान क्र.१४३ व अ.क्र.५ वर रक्कम रूपये ३ लाखाची ठेवण्यात आलेली आर्थिक तरतुद मोहल्ला कुतुबपुरा येथील विविध भागात हाफ़ राऊंड गटार तयार करणेच्या कामासाठी वर्ग करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४६/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्पातील मंजुर काम पृष्ठ क्र.१४१ अ.क्र.७८ येथील समतानगर डॉ.कराड हॉस्पीटल ते ऑटो कार्स शोरूम रस्त्याचे डांबरीकरण करणे रू.३ लाख तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

तरी सदरील रक्कम डांबरीकरणासाठी न वापरता माझ्याच प्रभागातील समतानगर कब्रस्थान विकसीत करणे करीता वापरण्यात यावी करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ऐनवेळचा विषय म्हणून ठेवण्यात यावा ही विनंती.

सुचक : श्री.नासेरखॉन कुरैशी अनुमोदक: श्री.माणिक साळवे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र.१४१ अ.क्र.७८ वर समतानगर डॉ.कराड हॉस्पीटल ते ऑटो कार्स शोरूम रस्त्याचे डांबरीकरण करणे करीता ठेवण्यांत आलेली र.रू.३ लाखाची तरतुद त्याच प्रभागात समतानगर कब्रस्थान विकसीत करणे करीता वापरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४७/१८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.८० मध्ये आगामी अर्थ संकल्पात खालील कामाचा समावेश करण्यात आलेला आहे. तथापी ही कामे रद्द करून सदरील कामासाठी ठेवण्यात आलेला निधी

हा माझे प्रभागात सांस्कृतिक सभागृह बांधणेसाठी वापरण्यात यावा. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

१. प्रभाग क्र.८० विडी कामगार हौ.सो.श्री.वखरे यांचे घरापासून श्री.बाळु सुरसे यांचे घरापर्यंत डांबरीकरणे करणे - रू.२ लाख.

२. प्रभाग क्र.८०, गांधीनगर गटारीवर ढापे टाकणे - रू.२ लाख.

३. प्रभाग क्र.८०,गांधीनगर रमेश लाहोट यांच्या घरा समोरील नाल्यावर स्लॅब टाकणे रू.१.५० लाख

उपरोक्त रू.५.५ लाखाचे कामे रद्द करून त्याच रक्कमेत गांधीनगर परीसरात सांस्कृतिक हॉल बांधणे करीता शिर्षक बदलासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.बबिता कागडा अनुमोदक : सौ.मंदाबाई प्रभाकर पवार

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८० साठी आगामी अर्थसंकल्पात ठेवण्यांत आलेल्या प्रस्तावित अ.क्र.१ते३ कामाच्या ऐवजी त्याच प्रभागात तेवढ्याच रक्कमेत गांधीनगर परीसरात सांस्कृतिक हॉल बांधणे करीता लेखा शिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४८/१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील भडकल गेट पुढील वाहतूक सिग्नलसाठी असलेल्या चौकामध्ये भारताचे पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांचा पुतळा बसविण्यात यावा व सदरील कामासाठी येणारा संभावित खर्चास मंजूरी मिळणेसाठी प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मीर हिदायत अली अनुमोदक : श्री.मो.जावेद कुरैशी ,सौ.साजेदा बेगम

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका हद्दीतील भडकल गेट पुढील वाहतूक सिग्नलसाठी असलेल्या चौकामध्ये भारताचे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांचा पुतळा बसविण्यास व सदरील कामासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४४९/२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कोकणवाडी प्रभागात पदमपुरा, संत तुकाराम वस्तीगृह,लगत न.भु.क्र.१८२३५/१ एकूण संपादित क्षेत्र ९१०.९० चौ.मीटर (०९ गुंठे) ही महानगरपालिकेच्या मालकीची असलेली जमीन शैक्षणिक कार्यासाठी महाराष्ट्र ग्रामीण आरोग्य व शिक्षण संस्था, औरंगाबाद यांनी मागणी केली आहे की, ही संस्था नोंदणीकृत आहे. ह्या संस्थेस शाळा चालविण्यासाठी महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेली जमीन,महानगरपालिकेने ठरविलेल्या दराने महाराष्ट्र ग्रामीण आरोग्य व शिक्षण संस्था, औरंगाबाद ह्या संस्थेस समुचित प्राधीकरण घोषित करून जागा प्रदान करण्याचा प्रस्ताव स्विकृतीसह मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मीर हिदायत अली, श्री.नंदकुमार फ़ुलारी अनुमोदक: श्री.निर्मलाबाई कांबळे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोकणवाडी प्रभागात पदमपुरा, संत तुकाराम वस्तीगृह,लगत न.भु.क्र.१८२३५/१ एकूण संपादित क्षेत्र ९१०.९० चौ.मीटर (०९ गुंठे) ही महानगरपालिकेच्या मालकीची असलेली जमीन शैक्षणिक कार्यासाठी महाराष्ट्र ग्रामीण आरोग्य व शिक्षण संस्था, औरंगाबाद यांना शाळा चालविण्यासाठी महानगरपालिकेच्या ठरविलेल्या दराने महाराष्ट्र ग्रामीण आरोग्य व शिक्षण संस्था, औरंगाबाद ह्या संस्थेस समुचित प्राधीकरण घोषित करून जागा प्रदान करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५०/२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महापालिके तर्फे शहरातील नागरीकांना मालमत्ता कर आणि पाणी पट्टीच्या वसुलीकरीता स्वतंत्रपणे नोटीसा दिल्या जातात. त्यामुळे अनेकवेळा मालमत्ता कर किंवा पाणी पट्टी कर यापैकी एका कराची थकबाकी राहण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. दोन्हीही करांची वसुली एकत्रितपणे होण्याचे दृष्टीने मालमत्ता करासोबतच पाणीपट्टी कराची मागणी नोटीस एकच असावी. जेणे करून संबंधीत मालमत्ता धारकाकडून पाणीपट्टी कराची रक्कम व मालमत्ता कराची रक्कम एकाच वेळी वसूल करणे सोयीचे होईल व पर्यायाने महापालिकेच्या वसुलीमध्ये देखील वाढ होऊ शकते. म्हणून मालमत्ता कर आणि पाणीपट्टी कराची मागणी नोटीस एकत्रितपणे मालमत्ता धारकांना देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.नंदकुमार घोडेले अनुमोदक: श्री.किशनचंद तनवाणी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिके तर्फे शहरातील नागरीकांना मालमत्ता कर आणि पाणी पट्टीच्या वसुलीकरीता स्वतंत्रपणे नोटीसा न देता व वसुली होणेच्या दृष्टीने मालमत्ता करासोबतच पाणीपट्टी कराची मागणी नोटीस एकच असावी. जेणे करून संबंधीत मालमत्ता धारकाकडून पाणीपट्टी कराची रक्कम व मालमत्ता कराची रक्कम एकाच वेळी वसूल करणे सोयीचे होईल, यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५१/२२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या प्रभागातील विजयनगर येथे पाणीपुरवठा करणारी नविन लाईन टाकण्यासाठी २००४-०५ च्या अर्थसंकल्पामध्ये पान नं.१५२ व अ.क्र.३८ वर प्रभाग क्र.१८ येथील विजयनगर येथे नविन पाणीपुरवठा पाईपलाईन टाकणे. तरतुद अशी आहे. त्याऐवजी प्रभाग क्र.१८ भगवती कॉलनी येथील कांकरिया यांच्या घराशेजारील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे तसेच या रस्त्यातील विद्युत डी.पी.हलविणे असा बदल करण्यास प्रस्ताव सादर .

सुचक : डॉ.आशा बिनवडे अनुमोदक : सौ.विजया रहाटकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.१८ विजयनगर येथे पाणीपुरवठा करणारी नविन पाईप लाईन टाकण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये पान नं.१५२ व अ.क्र.३८ वर ठेवण्यात आलेली आर्थिक तरतूद त्याच प्रभागात भगवती कॉलनी येथील कांकरिया यांच्या घराशेजारील रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेस लेखा शिर्ष बदलणेस तसेच या रस्त्यातील विद्युत डी.पी.हलविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५२/२३ :**

ज्योतीनगर वॉर्डात खालील विकासाची कामे मंजूर करून त्यांची इस्टीमेट व त्यांचे टेंडर करावे.

१. ज्योतीनगर वॉर्डात जलतरण तलाव बी.ओ.टी. वर न करता मनपाच्या माध्यमातून करावा.

२. ज्योतीनगर वॉर्डात पाण्याची टाकी बांधण्यासाठी व इस्टीमेट व टेंडर करण्यासाठी मंजूरी द्यावी.

सुचक : सौ.विजया रहाटकर, सौ.साधना सुरडकर,डॉ.भागवत कराड,श्री.किशनचंद तनवाणी, सौ.सुवर्णा चंद्रात्रे

अनुमोदक : श्री.आनंद तांदुळवाडीकर,श्री.जयवंत ओक, श्री.प्रशांत देसरडा, श्री.प्रल्हाद निमगांवकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ज्योतीनगर वॉर्डात जलतरण तलाव बी.ओ.टी. वर न करता मनपाच्या माध्यमातून करणेस तसेच ज्योतीनगर वॉर्डात पाण्याची टाकी बांधण्यासाठी इस्टीमेट व टेंडर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५३/२४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,ज्योतीनगर येथील खुल्या जागेत बांधावयाच्या पाण्याच्या टाकीचे व त्यासाठीच्या वितरण व्यवस्थेचे अंदाजपत्रक रू.१,२२,६४,५२७ चा प्रस्ताव आजच्या स.सा.सभेत मंजूर करण्यास्तव सादर.

सुचक : सौ.विजया रहाटकर,डॉ.आशा बिनवडे, डॉ.भागवत कराड,सौ.सुवर्णा चंद्रात्रे,श्री.संजय शिरसाट

अनुमोदक : श्री.प्रकाश निकाळजे,श्री.जयवंत ओक, श्री.भाऊसाहेब वाघ.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ज्योतीनगर येथील खुल्या जागेत बांधावयाच्या पाण्याच्या टाकीचे व त्यासाठीच्या वितरण व्यवस्थेचे अंदाजपत्रक रू.१,२२,६४,५२७ च्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५४/२५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येते की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत मोहल्ला देवडी बाजार नाला लगत मनपाची मोकळी जागेमध्ये सामाजिक सभागृह बांधण्यासाठी मा.ना.श्री.राजेंद्र दर्डा यांच्या आमदार निधीतून व महानगरपालिकेच्या ना हरकत प्रमाणपत्र देण्याची परवानगीसह प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.निखत परवीन एजाज जैदी

अनुमोदक : श्री.मिर हिदायत अली, श्री.स.सलीम स.युसूफ, श्री.नासेर खॉन, सौ.चंद्रभागाबाई दाणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका हद्दीत मोहल्ला देवडी बाजार नाला लगत मनपाच्या मोकळ्या जागेमध्ये आमदार निधीतून सामाजिक सभागृह बांधण्यास व त्यासाठी महानगरपालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५५/२६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, शहानुरमियॉ दर्गा कमानीजवळ असलेल्या चौकास ‘‘ एकता चौक ‘‘ असे नांव देण्यांत यावे,करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.साधना सुरडकर,श्री.किशनचंद तनवाणी अनुमोदक : डॉ.भागवत कराड, श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरमियॉ दर्गा कमानीजवळ असलेल्या चौकास ‘‘ एकता चौक ‘‘ असे नांव देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५६/२७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,सन २००४-२००५ चे अर्थसंकल्पात पान क्र.१२६ वर नविन डांबरीकरण करीता स्पील ओव्हर कामाचे यादीमध्ये शहानुरवाडी परिसरातील मंजुर रेखाकंनातील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे यासाठी रू.पाच लाख तरतूद ठेवण्यात आलेली आहे. तरी यात बदल करून सदरील कामाचा समावेश नविन डांबरीकरण या सदरात करण्यात यावा, करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.साधना सुरडकर अनुमोदक : डॉ.भागवत कराड, सौ.विजया रहाटकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,अर्थसंकल्पामध्ये पान क्र.१२६ वर नविन डांबरीकरण करण्याकरिता स्पील ओव्हरच्या यादीमधील कामामध्ये शहानूरवाडी परिसरातील मंजूर रेखांकनातील रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी ५ लाखाची तरतूद ठेवण्यात आलेली आहे त्याऐवजी सदरील कामाचा समावेश नविन डांबरीकरण या सदरात करणेसाठी सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५७/२८ :**

मनजितनगर येथील नागरीकांच्या मागणी नुसार येथील जागा नागरीकांच्या उपयोगासाठीच ठेवावी, दि.३०.०३.१९९८ च्या स्थायी समितीचा ठराव क्र.५८८/१५ प्रमाणे सदरील जागा आयकॉन नॅशनल स्पोर्ट क्लब यांना देण्यात आलेली आहे, तो ठराव रद्द करून जागा नागरीकांच्या मागणीनुसार नागरीकांना खुली करावी असा ठराव सर्वसाधारण सभेत घेण्यात यावा.

सुचक : श्री.प्रशांत सुभाष देसरडा अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दि.३०.०३.१९९८ च्या स्थायी समितीचा ठराव क्र.५८८/१५ नुसार मनजितनगर येथील जागा नॅशनल स्पोर्ट क्लब यांना देण्यात आलेली मंजुरी रद्द करून सदरील जागा नागरीकांना खुली करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५८/२९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ उद्यानाच्या मागे असणाऱ्या धोबी घाटास '' कै.सेठ मन्सारामजी लिंगायत '' यांचे नांव देण्यांत यावे. कै.सेठ लिंगायतजी हे धोबी समाजाचे २५ वर्ष अध्यक्ष होते. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : १. डॉ.भागवत कराड,२.श्री.किशनचंद तनवाणी अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यानाच्या मागील धोबी घाटास '' कै.सेठ मन्सारामजी लिंगायत '' यांचे नांव देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४५९/३० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अर्थसंकल्प २००४-२००५ मध्ये पान क्र.११५ वर वार्ड क्र.३४ मध्ये पोलिस कॉलनी येथे व्यायाम शाळा बांधणे करीता र.रू.४.०० लक्ष ची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु सदरील जागा ही सार्वजनिक विभागाची असल्याने ते महानगरपालिकेकडे हस्तांतरण करीत नाहीत.

त्यामुळे सदरील व्यायामशाळा ही पोलिस कॉलनी येथे न बांधता शांती निकेतन कॉलनीमध्ये शनि मंदिरा समोरील मनपाच्या खुल्या जागेत बांधण्यात यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : १. डॉ.भागवत कराड,२.श्री.किशनचंद तनवाणी अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,अर्थसंकल्पामधील पान क्र.११५ वर वार्ड क्र.३४ मध्ये पोलिस कॉलनी येथे व्यायाम शाळा बांधणे करीता र.रू.४.०० लक्ष ची तरतूद आहे या ऐवजी शनि मंदिरा समोरील मनपाच्या मोकळ्या जागेत व्यायाम शाळा बांधणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६०/३१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००४-२००५ मध्ये पान क्र.१४१ वर वार्ड क्र.३४ मध्ये डांबरीकरण करणे करीता र.रू.८.०० लक्ष ची तरतुद करण्यांत आलेली आहे. परंतु सदरील तरतुद ही त्या कामाकरीता न वापरता माझ्याच प्रभागातील चिंतामणी कॉलनीत व शनिमंदिरा समोरील रस्त्यात फुटपाथवर चेक्स टाईल्स टाकण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : १. डॉ.भागवत कराड,२.श्री.किशनचंद तनवाणी अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पा मधील पान क्र.१४१ वर वार्ड क्र.३४ मध्ये डांबरीकरण करणे करीता र.रू.८.०० लक्ष ची तरतुद आहे या ऐवजी शनिमंदिरा समोरील रस्त्यात फुटपाथवर चेक्स टाईल्स टाकणेकरीता सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६१/३२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वार्ड क्र.५९ मध्ये जल नि:स्सारण विभागा अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन आप्रुटींग साठी रूपये चार लक्ष (रू.४,००,०००/-) ची आर्थिक तरतुद ठेवण्यांत आली होती. त्या ऐवजी प्रभाग क्र.५९ मध्ये वरील कामा ऐवजी गटार बांधणे व त्यावर चौकोनी ढापे टाकणे हे काम करण्यांत यावे.

करीता लेखा शिर्षक बदलण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.संगिता बाळू मैंद अनुमोदक : सौ.विजया रहाटकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५९ मध्ये जल नि:स्सारण विभागा अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन आप्रुटींग साठी ठेवण्यांत आलेली र.रूपये चार लक्ष (रू.४,००,०००/-) ची आर्थिक तरतुद या ऐवजी सदरील प्रभागात गटार बांधणे व त्यावर चौकोनी ढापे टाकणे यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६२/३३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दरवर्षी आपण महापौर चषक क्रिडा स्पर्धा मध्ये विविध क्रिडा स्पर्धेचे आयोजन केले जाते. तथापी याही वर्षी महापौर चषक क्रिडा स्पर्धेमध्ये रायफ़ल शुटींग स्पर्धेचे समावेश करावे. तसेच औरंगाबाद जिल्हा रायफ़ल शुटींग संघटना ही गेल्या अनेक वर्षापासून संस्थेच्या वतीने विविध स्पर्धेचे आयोजन करून यशस्वी रित्या पार पाडल्या आहेत.

करीता या वर्षी महापौर चषक स्पर्धेमध्ये रायफ़ल शुटींग स्पर्धा औरंगाबाद जिल्हा रायफ़ल संघटना यांच्या मार्फ़त आयोजित करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

सुचक : रणधिरसिंह होलिये अनुमोदक : चंद्रशेखर जैस्वाल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापौर चषक स्पर्धेमध्ये रायफ़ल शुटींग स्पर्धाचा समावेश करून औरंगाबाद जिल्हा रायफ़ल संघटना यांच्या मार्फ़त आयोजित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६३/३४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरामध्ये महानगरपालिके मार्फत देण्यात येणाऱ्या बांधकाम परवानगी या सन १९८२ सालापासून असलेल्या नियमानुसार आहे. औरंगाबाद शहराची वाढ मोठ्या प्रमाणावर झालेली आहे.

इमारत बांधकाममध्ये विषेशत: मोठ्या इमारती व हॉस्पीटल, शाळा, महाविद्यालय, बँका, सार्वजनिक ठिकाणे, शॉपिंग सेंटर, तसेच जास्त लोक राहत असलेल्या प्लॅटेड इमारती मध्ये जिना लहान असल्याने दुर्घटना झाल्यास आणि मोठ्या प्रमाणावर होण्याची शक्यता आहे. शहरामध्ये आता सर्वच इमारतीचे जिने अत्यंत लहान आहे. लांब व रूंद जिने आग व इतर दुर्घटनामध्ये तातडीने बाहेर पडण्याकरीता सुविधाजन्य होतात. दक्षिण भारतात शाळेमध्ये लागलेली आग ही दुर्घटना सर्वज्ञात आहे. त्याठिकाणी जिन्यामुळेच मोठ्या प्रमाणावर प्राणहानी झाल्याचे कळते. सध्या जिना (स्टेअर केअर) व लिप्ट या जागेचे क्षेत्र इमारत बांधकाम क्षेत्रात (एफ.एस.आय.) समावेश असल्यामुळे उपरोक्त रिकामी लांब व रूंद जिने वापरत नाही असा अनुभव आहे. त्यामुळे इतर प्राधिकरणाने जसे जिना व लिफ्ट चे

क्षेत्रफळ एफ.एस.आय.मधून वगळले आहे. तसे महानगरपालिकेने वगळावे ज्यामुळे इमारतीमध्ये मोठ्या आकाराचा जिना व लिफ्टचे बांधकाम होईल. ज्यामुळे दुर्घटना झाल्यास प्राणहानी व वित्तहानी होणार नाही. तसेच मोठ्या आकाराचे फ्लॅट करीता महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या परवानगीची संख्या अत्यंत कमी आहे. नागरीकांना आता ग्रुप हाऊसिंग सोसायटी मध्ये राहणे अधिक चांगले व सुरक्षित वाटू लागले आहे. पुणे, मुंबई सारख्या महानगराप्रमाणे आपल्या शहरामध्ये देखिल नागरीकांच्या फायद्याबद्दल मोठ्या प्रमाणामध्ये ग्रुप हाउसिंग बांधकाम होणे आवश्यक आहे. त्याकरीता ग्रुह हाऊसिंग या योजनेमध्ये देण्यात येणारे चटई क्षेत्र निर्देशांक ०.७५ वरून ०.९० एवढे वाढविल्यास नागरीकांना त्याचा अधिक फायदा होईल. व शहराचा विकास मोठ्या प्रमाणावर होईल. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल.

तरी जिना क्षेत्र व लिफ्ट चटई क्षेत्रातून वगळून द्यावी व ग्रुप हाऊसिंग योजनेकरीता चटईक्षेत्र ०.७५ ऐवजी ०.९० एवढे देण्यात यावे.

आवश्यक वाटल्यास कलम ३७ ची कारवाई मा.आयुक्तांनी करावी. याची मंजूरी तातडीने द्यावी ही विनंती.

सुचक – श्री.शेख खाजा शरफोद्दीन अनुमोदक – राजेंद्रसिंग जबिंदा

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबई व पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर ग्रुप हाऊसिंग या योजनेमध्ये देण्यात येणारे चटई क्षेत्र निर्देशांक ०.७५ वरून ०.९० एवढे वाढविण्यास तसेच जिना क्षेत्र व लिफ्ट चटई क्षेत्रातून वगळण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणेस व ही कार्यवाही पूर्ण करून शासनास प्रस्ताव सादर करण्याचे अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६४/३५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महापौर चषक क्रिडा स्पर्धा अंतर्गत राज्य स्तरीय महापौर चषक कराटे स्पर्धा ही औरंगाबाद डिस्ट्रीक्ट कराटे असोसिएशन यांच्या मार्फ़त आयोजित करण्यात यावी. करिता प्रस्ताव स्विकृतीसह मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.विकास जैन

अनुमोदक : श्री.नंदकुमार फ़ुलारी, सौ.साधना सुरडकर, श्री.मीर हिदायत अली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापौर चषक क्रिडा स्पर्धा अंतर्गत राज्य स्तरीय महापौर चषक कराटे स्पर्धा ही औरंगाबाद डिस्ट्रीक्ट कराटे असोसिएशन यांच्या मार्फ़त आयोजित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६५/३६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महापौर चषक क्रिडा स्पर्धा अंतर्गत राज्य स्तरीय महापौर चषक फ़ुटबॉल स्पर्धा ही औरंगाबाद डिस्ट्रीक्ट फ़ुटबॉल असोसिएशन,औरंगाबाद यांच्या मार्फ़त आयोजित करण्यात यावी.

करिता प्रस्ताव स्विकृतीसह मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मीर हिदायत अली अनुमोदक : श्री.अब्दुल कादर अ.हफ़िज

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापौर चषक क्रिडा स्पर्धा अंतर्गत राज्य स्तरीय महापौर चषक फ़ुटबॉल स्पर्धा ही औरंगाबाद डिस्ट्रीक्ट फ़ुटबॉल असोसिएशन,औरंगाबाद यांच्या मार्फ़त आयोजित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४६६/३७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वार्डातील शाह बाजार येथे रिटेनिंग वॉल बांधण्यासाठी महानगरपालिका अर्थसंकल्प २००४-०५ मध्ये रक्कम रूपये १५ लाखाची आर्थिक तरतुद पान क्र.११४ व अ.क्र.१२ वर करण्यात आलेली आहे. परंतु शाहबाजार अशोक नगर येथे सुलभ शौचालय बांधणे आवश्यक असल्याने सदरील तरतुदीमध्ये सुलभ शौचालयसाठी रक्कम रूपये २.५० लाख वर्ग करण्यासाठी प्रस्ताव सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मिर हिदायत अली                    अनुमोदक : सौ.नईम सुलताना सिद्दीकी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहाबाजार येथे रिटेनिंग वॉल बांधण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये पान क्र.११४ व अ.क्र.१२ वर ठेवण्यांत आलेली रक्कम रूपये १५ लाखाची आर्थिक तरतुदी मधून शहाबाजार अशोक नगर येथे सुलभ शौचालय बांधणे करीता रक्कम रूपये २.५० लाख वर्ग करणेस सर्वानूमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६७/३८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे शहरातील नागरीकांना पाणी पुरवठा करण्यांत येतो. सदरील पाणी पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून व्यावसायिक दराने वीजेचे देयक सादर केले जाते. परंतु मनपा ही सेवाभावी संस्था असून नागरीकाकडून अल्पदरात पाणी पुरवठा केला जातो. त्यामुळे मनपास आर्थिक लाभ न होता, आर्थिक नुकसान सहन करून नागरीकांना पाणी पुरवठा करीत असते. त्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची थकबाकी अंदाजे १२५ करोड रूपये एवढी झालेली आहे.

तथापि मुळा प्रवरा सहकारी संस्था ही म.रा.वि.म.कडुन वीत विकत घेवुन नागरीकांना वीज पुरविते. याद्वारे ते व्यवसाय करीत असुन देखील महाराष्ट्र शासनाने आतापर्यं ५०० कोटी रूपये माफ केलेले आहेत. याच धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेस म.रा.वि.म.चे १२५ कोटी रू.माफ करून ग्रामीण भागातून ज्या ठिकाणी उपसा केल्या जाते त्या ठिकाणचे ग्रामीण दरानुसार देयक लावणे व त्यानुसार पुढील कार्यवाही प्रशासनातर्फे तात्काळ करणे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : १. श्री.मधुकर सावंत, २. सौ.विजया रहाटकर                    अनुमोदक : सौ.साधना सुरडकर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे शहरातील नागरीकांना पाणी पुरवठा करण्यांत येतो. सदरील पाणी पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून व्यावसायिक दराने वीजेचे देयक सादर केले जाते, मनपा ही सेवाभावी संस्था असून नागरीकांना अल्पदरात पाणी पुरवठा केला जात असल्यामूळे महापालिकेस आर्थिक लाभ न होता, आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्यामूळे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची थकबाकी अंदाजे १२५ करोड रूपये एवढी झालेली आहे, तथापि मुळा प्रवरा सहकारी संस्था ही म.रा.वि.म.कडुन वीत विकत घेवुन नागरीकांना वीज पुरवित असल्यामूळे याद्वारे ते व्यवसाय करीत असुन महाराष्ट्र शासनाने आतापर्यंत सदरील संस्थेस रू.५०० कोटी रूपये माफ केलेले असल्यामूळे, याच धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेस म.रा.वि.म.चे १२५ कोटी रू.माफ करून ग्रामीण भागातून ज्या ठिकाणी उपसा केल्या जाते त्या ठिकाणचे ग्रामीण दरानुसार देयक लावणे व त्यानुसार पुढील कार्यवाही प्रशासनातर्फे तात्काळ करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

श्री.किशनचंद तनवाणी : ए-१ च्या कामा संदर्भात स्थायी समितीमध्ये चर्चा झालेली होती. आतापर्यंत ज्या पध्दतीने ए-१ ची कामे होत आहे त्याच पध्दतीने करावी त्याची

अंमलबजावणी व्हावी तसे प्रशासनास आदेश करावे. कार्यपध्दतीत बदल करण्यात येऊ नये.

मा.महापौर : यापूर्वी ए-१ निविदाची कामे ज्या प्रमाणे होत होती त्या पध्दतीने करण्यांत यावी.

नगर सचिव : सभेचे कामकाज संपलेले आहे. स.सभासदांना विनंती की मा.आयुक्त हे मा.महापौरांना पर्यावरण अहवाल पुस्तिका सादर करणार आहे. या संदर्भात सर्व अधिकारी/कर्मचारी पदाधिकारी यांना संबंधीत विभागा अंतर्गत या सभागृहात माहिती देणार आहे. कृपया सर्वांनी याची नोंद घ्यावी.

यानंतर पर्यावरण अहवाला संबंधीची माहिती सभागृहात दिली जाते.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| नगर सचिव, | महापौर, |
| महानगरपालिका,औरंगाबाद | महानगरपालिका,औरंगाबाद |